
पुणे, किशोर– वर्ष ५२, अंक १ ला, जानेवारी २०२३, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 52, Issue- 1, January 2023 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

जानेवारी २०२३





# इथेच घेईन जन्म

माझा भारत माझा भारत
एकच घोष सदैव करत
या देशाचे पांग फेडण्या
इथेच घेईन जन्म परत

राष्ट्रगीताला हृदयी ठेवत
तिरंग्याला नेईन मिरवत
मातृभूमीची महती गाण्या
इथेच घेईन जन्म परत

विज्ञानाची कास धरत
सूर्याशीही राहीन झुंजत
कुप्रथांना धिक्कारण्या
इथेच घेईन जन्म परत

इतिहासाला रोज आठवत
परंपरांची करीन सोबत
ऋषी-मुनींना नित्य स्मरण्या
इथेच घेईन जन्म परत

दैव-नशीब नाही मानत
चक्रासारखा राहीन फिरत
बाहूंमधली ताकद दावण्या
इथेच घेईन जन्म परत

प्रिय मजला माझा भारत
सिंहासारखा राहीन गर्जत
जन्मोजन्मी आहुती देण्या
इथेच घेईन जन्म परत

रमेश तांबे
संपर्क :
९७५७३४५३८३

किशोर

जानेवारी २०२३, वर्ष ५२ वे,
अंक १ ला, पौष-माघ, शके १९४४

संपादक :
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

प्रकाशक :
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

- कार्यकारी संपादक :
किरण केंद्रे

- निर्मिती अधिकारी :
हेमंत बाबर

- वितरण व्यवस्थापक
जालिंदर पाटील

- मुखपृष्ठ : श्रीनिवास प्रभुदेसाई
संपर्क : ९८३३७६७०३५

- चित्रांकन : श्रीनिवास प्रभुदेसाई, घनश्याम देशमुख, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, योगिता धोटे, माईंडइट संवाद, जैत्र डिजिटल, निकिता वैद्य

- अक्षरजुळणी : किशोर विभाग

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/-
मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

- ऑनलाइन वर्गणीकरिता :
www.kishor.ebalbharati.in

**पत्रव्यवहाराचा पत्ता:**
**कार्यकारी संपादक, किशोर,**
**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व**
**अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४
संपादकीय : ०२०- २५७१६१०७
वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

# अंतरंग

०२ इथेच घेईन जन्म — रमेश तांबे
०६ आजोबांचं अंगण — ऐश्वर्य पाटेकर
११ क्रांतिज्योती — हिंमतराव पाटील
१२ रामभरोसे कानहलके — श्रीकांत बोजेवार
१७ सहलीला जाऊ — घनशाम सावरकर
१८ आजूबाजूची माणसे — जसबीर भुल्लर, अनुवाद- पृथ्वीराज तौर
२१ निसर्ग... — डॉ. विजयकुमार माने
२२ 'बुद्धी'चा लाडू — राजश्री राजवाडे- काळे
२५ सत्य शिव अन् सुंदरता — दत्तात्रय जोशी
२६ खळ्यावर ऐकलेल्या आजीच्या गोष्टी — सुरेश शिंगटे
३० भूत तर दिसलेच नाही पण... — मनोज बोरगावकर
३३ प्रार्थना — संयुक्ता कुलकर्णी
३४ देवी — डॉ. संजीव कुलकर्णी
३७ आता मैदानावर चला.. — सतीश लोथे
३८ कुतूहल — अमित डहाणे



## बाल विभाग

४० भावी आधारस्तंभ
४२ उमलती प्रतिभा
४४ चित्रकथा — घनश्याम देशमुख
४६ जहाज — तुकाराम खिल्लारे

## ENGLISH SECTION

47 My food journey — Dr Rasika Thosar
48 Smiling Mountain — Prof. B. N. Chaudhari
50 Puzzle

## प्रिय किशोर

दोस्त आमुचा ‘किशोर’ आहे
सुंदर सुजाण सुबोध आहे
दोस्त आमुचा ‘किशोर’ आहे

दर महिन्याला हसत येतो
आम्ही त्याला मिठीत घेतो
आम्हांस त्याची ओढ आहे
दोस्त आमुचा ‘किशोर’ आहे

रंगीत मोहक रूप देखणे
फुलांसारखे गोजिरवाणे
एकच आहे अजोड आहे
दोस्त आमुचा ‘किशोर’ आहे

छान छान हा सांगे गोष्टी
दावी आम्हा नवीन सृष्टी
पोर आहे हा थोर आहे
दोस्त आमुचा ‘किशोर’ आहे

ऐकवितो हा कविता गाणी
रसाळ मधाळ मंजुळवाणी
शब्द न् शब्द अनमोल आहे
दोस्त आमुचा ‘किशोर’ आहे

गंमत जंमत करून हसवतो
जंगल जंगल सफर घडवतो
सहवास याचा गोड आहे
दोस्त आमुचा ‘किशोर’ आहे

किशोर सांगे कसे जगावे
कसे आपुले जग घडवावे
कार्य याचे बहुमोल आहे
दोस्त आमुचा ‘किशोर’ आहे

उत्तम कोळगावकर
संपर्क : ९५४५२१२७८३

# बलसागर भारत होवो...

हितगुज


२६ जानेवारी अर्थात भारतीय प्रजासत्ताक दिवस हा सर्व भारतीयांसाठी महत्त्वाचा राष्ट्रीय सण. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने अभ्यासपूर्वक तयार केलेले संविधान २६ जानेवारी १९५० रोजी नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारत देशाने अमलात आणले. लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली. म्हणूनच प्रत्येक भारतीयांसाठी मान, सन्मानाचा नि अभिमानाचा दिवस म्हणजे २६ जानेवारी होय.

आपल्या देशाच्या राजधानीत, दिल्लीमध्ये अतिशय सुंदर आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा होणारा प्रजासत्ताक दिन तुम्ही दूरदर्शनवर पाहता ना? अतिशय नयनरम्य सोहळा असतो नाही का? कार्यक्रमाची रूपरेषा, आयोजन, मांडणी ही उत्तम आणि अतिशय शिस्तबद्ध असते. यात वेगवेगळ्या कार्यक्रमांची रेलचेलच असते. आनंदाची पर्वणीच जणू! दरवर्षी २६ जानेवारीला दिल्ली येथे, एक मोठे संचलन आयोजित केले जाते. हे संचलन रायसीना हिलपासून राष्ट्रपती भवनापर्यंत राजपथ मार्गाद्वारे जाते. किती देखणे आणि विलोभनीय असते ते दृश्य! या संचलनात भारतातील विविध राज्यांचे आपापल्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे चित्ररथ सामील झालेले असतात. गायन, वादन, नृत्याचा अप्रतिम कलाविष्कार आपल्याला अनुभवायला मिळतो.

याच दिवशी देशासाठी अमाप शौर्य गाजवलेल्या सैनिकांना भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते अशोक चक्र आणि कीर्ती चक्र, हे मोलाचे पुरस्कार देण्यात येतात. या पुरस्कार सोहळ्यातील तुम्ही किशोर मित्र- मैत्रिणींनी आवर्जून पाहावा असा अजून एक महत्त्वाचा भाग म्हणजे प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या देशातील शूरवीर व हुशार बालकांची मिरवणूक. यंदा आपल्या देशातील ही सर्व शौयवान व हुशार मुले सजवलेल्या हत्तीवरून किंवा वाहनावरून प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात सहभागी होणार आहेत. तुम्हा सर्वांसाठी किती आनंदमय आणि प्रेरणा देणारे दृश्य असेल ते! कोविड साथीमुळे यापूर्वीच्या पुरस्कारप्राप्त बालकांना संचलनात सहभागी होता आले नव्हते. संपूर्ण भारतातील सुमारे ३० हुशार व शूर बालकांना प्रजासत्ताक दिनाच्या आधी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार दिला जातो. आपल्या बुद्धिमत्तेचे, कौशल्याचे, गुणवत्तेचे दर्शन घडवणाऱ्या तसेच अतिशय कठीण प्रसंगात स्वतःमधील अतुलनीय शौर्य दाखवणाऱ्या या धाडसी बालकांची निवड दरवर्षी या पुरस्कारासाठी केली जाते. नवनिर्मिती, बुद्धिमत्ता, समाजसेवा, कला व संस्कृती, क्रीडा, शौर्य या क्षेत्रातील उत्तम कामगिरीसाठी हे पुरस्कार दिले जातात. पदक, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप असते. तुम्हीदेखील या पुरस्कारांची माहिती मिळवा आणि यश संपादन करा.

आपणांस भारतीय प्रजासत्ताक दिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा !

जय हिंद!





**किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक

ऐश्वर्य पाटेकर

# आजोबांचं अंगण

माझ्या छोट्या मित्रांनो, 'आजोबांचं अंगण' तुम्हांस माहीत आहे का? आणि बरं का ते कुठल्या मॉलमध्ये विकत नाही मिळत. ते कुठं मिळतं, ते कसं आहे, ते पाहण्यासाठी आपल्याला ही गोष्ट वाचावी लागेल.

अंशुमनला सुट्टी लागली. दरवर्षीचं त्याला सुट्ट्या मिळतात. पण या वेळची सुट्टी त्याच्यासाठी खास होती. कारण त्याला त्याच्या गावी जायला मिळणार होतं. वर्गातल्या मित्रांपेक्षाही त्याचा खूप जवळचा मित्र होता, तो म्हणजे त्याचे आजोबा. आजोबा गावातल्या घरी



राहत होते. आपल्या आजोबांसारखा मित्र जगात कुणालाच नसेल असं अंशुमनला वाटायचं. त्याचे आजोबा होतेच तसे. किती गप्पागोष्टी करायचे त्याच्याशी! अगदी खेळसुद्धा खेळायचे. शिवाय आपल्या वर्गातल्या मुलांसारखे रडी खेळ नाही खेळायचे. शिवाय आपल्या आई-बाबांसारखं नव्हतं आजोबांचं. ''मी जेव्हा बाबांना प्रश्न विचारतो बाबा उत्तर तर देत नाहीतच, उलट ओरडतात माझ्यावर. आईचंही तसंच आहे. ती एकसारखी सिरीअल तरी बघत असते किंवा मोबाइल तरी घेऊन बसलेली असते. माझ्यासाठी त्यांच्याकडे बिलकूल वेळ नसतो. तसं आजोबांचं थोडचं आहे! आजोबांचा सगळा वेळ माझ्यासाठी! सुट्टीतील अख्खेच्या अख्खे दिवस माझ्या नावावर केलेले असतात आजोबांनी..!''

त्यानं एकदा विचारलंसुद्धा होतं आजोबांना,

''आजोबा, तुम्हांला वेळ मिळतो कसा माझ्यासाठी?''

''अरे, तू मला रोज भेटतो कुठे लबाडा! मग मी करतो काय? रोजच्या दिवसाचा वेळ बांधून ठेवतो गाठोड्यात!''

'गाठोडं?'

''मोठ्ठंच्या मोठ्ठं गाठोडं. मग तू असा भेटला की सोडतो गाठोडं अन् काढतो वेळ बाहेर!''

अंशुमनला हे खरंच वाटतं.

शहरातून गावाकडे जाणारी बस त्याला अगदी लवकर आणून सोडते गावात. त्याने तिला तसा दमच भरलेला असतो की मी माझ्या आजोबांकडे जातो आहे; त्यामुळे जराही दिरंगाई चालायची नाही. लवकरात लवकर नेऊन सोडायचं. बसनेही त्याची आज्ञा निमूटपणे पाळली. बसला बाय करत तो आपल्या आजोबांच्या घराकडे आईबाबांबरोबर निघतो. आजोबा अंगणातच बसलेले असतात. तो आजोबांकडे धावत जात आल्याची वर्दी देतो.

''आजोबा, आम्ही आलो!''

त्याला पाहिल्यावर आजोबांना कोण आनंद झाला! त्यांनी अंशुमनला गोंजारलं, त्याच्या गालांचे पापे घेतले.

''आजोबा, आता आम्ही तुमच्या सोबत आठ दिवस राहणार आहोत, हो की नाही ओ बाबा!''

''होनं याने हट्टच धरला. मला सुट्टी मिळत नसतानाही यावं लागलं!''

आई-बाबा घरात निघून गेले. दोघे आजोबा-नातू अंगणात बसले. आजोबांनी त्याचं बोट पकडून त्यास अंगणात घेऊन फिरवू लागले. ते जणू अंगणाला सांगत होते की माझा नातू आलाय. अंगणालाही आनंद झाल्यासारखा वाटत होता किंवा आजोबा या अंगणाशी बोलत असावेत असं अंशुमनला वाटले. संध्याकाळी शेजारपाजारची बरीच मुले अंगणात खेळायला आली. यांच्याशी अंशुमनची गट्टी झाली. नाही तर आपल्या त्या शहरातल्या घराला अंगण नाही. असं कुणी खेळायला येत नाही. सगळे आपले कम्प्यूटरवर गेम खेळत बसतात आपापल्या घरी. ते काय खेळ आहेत का? आपलं घर तर नुसतं कोंडवाडा. त्या कोंडवाड्यातून आपली सुटका करील तो एकमेव माणूस, म्हणजे आपले आजोबा. पण ते का येत नाही आपल्या शहरातल्या घरी? इथे एकटेच राहतात. नाही तर त्यांना हा अंगणाचा दोस्त सोडवत नसेल. आपण बाबांना सांगायचं का या अंगणाला घ्या आपल्या बरोबर म्हणून! म्हणजे आजोबा येतील आपल्या शहराच्या घरी, मग आपल्याला सुट्टीची वाट

पाहावी लागणार नाही.

बोलता बोलता सुट्टीचे दिवस संपत आले होते. तो अंगणात एकटाच बसला होता. तेवढ्यात कुठूनतरी आवाज आला, ''अंशुमन बाळा!'' अंशुमन इकडे तिकडे पाहू लागला. त्याला वाटलं आजोबांनीच हाक घातली. आजोबा तर आताच गावात गेले, देवदर्शनासाठी, मग कोण?

''अंशुमन बाळा अरे मी बोलतोय!''

'कोण?'

''अरे मी अंगण, तुझ्या आजोबांचा दोस्त!''

''अंगण कधी बोलतं का?''

''का बोलू शकत नाही मी! अरे मलाही बोलता येतं; पण हे खरं की सगळ्याच माणसांशी नाही बोलता येत मला. काही खास माणसं असतात त्यांच्याशीच मी बोलू शकतो!''

''म्हणजे मी खास आहे!''

''हो! तुझ्या आजोबांसारखाच तू खास आहेस!''

''माझ्या आजोबांविषयी सांग मला!''

''हो रे... तेच सांगायचं आहे मला. तुझे आजोबा फार एकटे पडले. तुझी आजी वारल्यापासून तर खूपच. त्यांना तुझ्यावर खूप लळा आहे. त्यांना वाटतं की तुमच्या जवळ राहावं!''

''पण अरे आजोबांनाच नाही आवडत; आमच्या त्या शहराच्या घरी करमणार नाही म्हणतात!''

''खोटं आहे ते, अरे तू आहेस की त्या घरात. उलट तुझ्या आजोबांना तुझ्याशिवाय करमत नाही!''

''मग का येत नाही आमच्या बरोबर?''

''तुझ्या आई-बाबांना ते नको आहेत!''

''नाही खोटं सांगतोस तू. मी तर आईबाबांना विचारलं, तर म्हणतात आजोबाच आपल्याकडे येत नाहीत!''

''तुला वाटलं नं आजोबा देव-दर्शनासाठी गेले आहे. तर ते खोटं आहे. पलीकडच्या चिंचेच्या झाडाखाली बसून रडत असतील!''

अंगणाने असं सांगितल्याच्या नंतर अंशुमनला कुठे राहवतं? तो चप्पल घालण्यासाठी घरात पळाला तर आईबाबांचं बोलणं त्याच्या कानांवर पडलं. घरातील नोकर भीमा सांगत होता,

''दादांना तुमच्या बरोबर घेऊन जा मालक, ते अंशुमनची आठवण काढत लहान मुलासारखं रडत बसतात!''

''भीमा, तुझा पगार दुप्पट करतो आम्ही; पण तू सांभाळ त्यांना. आम्हाला शक्य नाही!''

''पगाराचं काही नाही, त्यांची हालत मला पाहवत नाही!''

''काही नाही भीमा. राहतील ते. आमच्यामागे का थोडी कामं आहेत का, यांचं कुणी पाहायचं?''


आईबाबांचं हे बोलणे ऐकून त्याला खूप वाईट वाटलं. त्याला अंगणाचं म्हणणं पटलं. अन् आपलेच आईबाबा त्याला दुष्ट वाटायला लागले. तो पळतच आजोबांकडे गेला. आजोबा चिंचेच्या झाडाखाली बसले होते. त्यांनी अंशुमनला पाहिलं अन् घाईघाईने आपले डोळे पुसले. अंशुमन आजोबाला मिठी मारून रडू लागला.

''बाळा, अरे रडायला काय झालं तुला?''

''आजोबा तुम्ही चला आमच्या बरोबर!''

''अरे, सुट्टी लागली की असं भेटायला यायचं, मला करमत नाही रे तुझ्या शहरातल्या घरी! त्या घराला अंगण नाही!''

''मी बाबांना सांगेन तुमच्यासाठी अंगण आणायला!''



“अरे, तो तुझा गेम नाही की कुठल्या दुकानात विकत मिळायला!”

“आजोबा, तुम्ही घरी आलात की आपलं अंगणही येईल तुमच्या बरोबर. ते इथे एकटं थोडच राहणार.”

आजोबांना काय वाटलं माहीत नाही. पण ते रडायला लागले. आजोबांचे डोळे पुसत अंशुमन म्हणाला,

“का बरं रडता आहात आजोबा तुम्ही?”

“तूच माझं अंगण आहेस बाळा!”

“अन् तुम्ही माझं अंगण!”

अंशुमन आणि त्याचे आईबाबा आपल्या शहरातल्या घरी परतले. गावावरून निघता निघताच रात्र झालेली. त्यामुळे जेवण करून जेव्हा तो त्या बिछान्यावर निजता निजता विचार करू लागला की आपल्या आजोबांना इथे आपल्याकडे आणायचं, पण कसं? त्याला एक कल्पना सुचली. अन् तो झोपी गेला. दुसऱ्या दिवशी त्याने आपल्या बाबांकडे हट्ट धरला,

“बाबा, मला अंगण हवंय!”

अंशुमनचे बाबा ऑफिसला निघायच्या तयारीत होते. बुटाची लेस बांधता बांधता म्हणाले,

“हो, संध्याकाळी घेऊन येतो, अरे पण कुठल्या मॉलमध्ये मिळेल मला हे अंगण?”

“काय बाबा, अंगण का मॉलमध्ये मिळणार?”

खरं तर त्याच्या बाबांना त्यांची चूक कळली,

की आपण हे काय बोलून गेलो. नेहमीच्या सवयीनुसार म्हणजे जगात पैशाने काहीही खरेदी करता येतं असं त्यांना वाटत होतं. आपली चूक सावरत ते म्हणाले,

''अरे मग ते अंगण मी कसं आणणार?''

''मला माहीत नाही. मला अंगण हवं म्हणजे हवं!''

''अंशुमन बाळा, एखादा गेम सांग, अगदी महागडा जरी असला तरी मी घेऊन येईन!''

''असंच जर असेल तर अंगणच घेऊन या माझ्यासाठी!''

''ते अंगण नाही देऊ शकत मी तुला!''

''मग तुम्ही कसले माझे बाबा!''

अंशुमनने असं म्हटल्यामुळे बाबांना असा काही राग आला. त्यांनी अंशुमनला मारलं. त्या दिवशी तो शाळेत गेला नाही. आईनं त्यास किती लाडीगोडी लावू पाहिली मात्र तो ठाम होता. रात्री त्याला खूप ताप आला. म्हणजे बेशुद्धच पडला. तातडीने डॉक्टरांना बोलवलं. त्याचे उपचार सुरू झाले. दोन दिवस तो शुद्धीवर नव्हता. आणि तिसऱ्या दिवशी जेव्हा त्याने डोळे उघडले तेव्हा त्याचे आजोबा त्याच्या उशाशी बसले होते. तो आनंदाने ओरडलाच.

'आजोबा!'

''हां बाळा, मी आलोय तुला भेटायला!''

''म्हणजे फक्त भेटायलाच आलात!''

''नाही, आता आजोबा आपल्याकडे कायमचे राहायला आले. ते आता तुला सोडून जाणार नाहीत.'' आई म्हणाली,

त्याने अंगावरचं पांघरूण बाजूला केलं. अन् गच्चीत पळत आला. खाली डोकावून पाहिलं तर आजोबांचं अंगणही आलं होतं. अंगण त्याच्याशी हसलं! अंशुमनच्या बाबांनी त्याला विचारलं,

''बाळा, कुणाशी हसतो आहेस?''

''बाबा ते आमचं गुपित आहे!''

बाबांना सांगितलं असतं तर त्यांना खरं थोडंच वाटलं असतं. हेच की आजोबांचं अंगण शहरात येऊन विसावलं आहे...!

संपर्क ९८२२२९५६७२



# क्रांतिज्योती

आगळी वेगळी जीवनगाथा
तुझ्या चरणी नमवतो माथा
थोरवी गाण्या तुझ्या कर्तृत्वाची
अपुरे पडती शब्द
सावित्रीबाईंचे नाव येताच
लेखणी होते नि:शब्द

घेऊन मशाल हाती
प्रज्वलित केलीस स्त्रीशिक्षणाची ज्योती
स्त्रीशिक्षणाचा करुनी श्रीगणेशा
स्त्रीजीवनाला दिलीस नवी दिशा
प्रसंगी झेललेस अंगावर शेणगोळे
म्हणून समाजात दिसत आहे चित्र वेगळे

चूल आणि मूल यापलीकडे
नेलेस स्त्रीला
स्त्रीकर्तृत्वाचा डंका
आज भिडे गगनाला
बंदिस्त घरातून मुक्त केलेस स्त्रीला
स्त्रियांचा स्वाभिमान तू जागा केला

स्त्रीउद्धाराचा घेऊनी ध्यास
घेतलास तू प्रत्यक श्वास
विधवा पुनर्विवाहाची करुनी सोय
दूर केलीस विधवांची गैरसोय
सामाजिक कार्यातही तू होतीस अग्रेसर
पती जोतिबांसोबत कायम समाजसेवेस तत्पर

हिंमतराव पाटील
संपर्क ९०२१६८१८५७



श्रीकांत बोजेवार

# रामभरोसे कानहलके

रामभरोसे नाकखुपशाची कथा तुम्ही दिवाळी अंकात वाचलीत. इतरांच्या वादात नाक खुपसल्यामुळे दोन साधूंनी त्याला शाप दिला, त्यातून त्याचं नाक लांब झालं आणि मग पुढे ते नेहमीसारखं छोटं कसं झालं, हे तुम्हांला माहीत आहे. पण रामभरोसे गप्प थोडीच बसणार होता. त्यानं पुढे काय काय पराक्रम करून ठेवले त्याच्या या कथा वर्षभर सदर स्वरुपात..



# बेभरवशा रामभरोसे



रामभरोसेला आता थेट राजाश्रयच मिळाला होता, त्यामुळे त्याचे चांगलेच फावले होते. लोकांचे लहान-सहान वाद सोडवण्याचे, तंटे मिटविण्याचे काम त्याला राजानेच दिले होते त्यामुळे तो लोकांकडे जाण्याऐवजी आता लोकच त्याच्याकडे येऊ लागले होते. नाक खुपसणे ही खरे तर त्याची वृत्ती होती. ज्यांच्या भांडणात तो नाक खुपसत असे ते लोक चिडायचे, नाराज व्हायचे किंवा अधिक जोरात भांडायचे, त्यातून रामभरोसेला एक प्रकारची मजा येत असे. आता तो राजाच्या दरबारातला अधिकृत नाकखुपशा झाला होता परंतु त्यात त्याला गंमत वाटेना. लोक चिडत-वैतागत नव्हते, त्यामुळे त्याला हवा तो आनंदही मिळेना. पण माणसाची वृत्ती ही वाहत्या पाण्यासारखी असते, एक वाट अडवली की पाणी बरोबर दुसरा मार्ग शोधून काढतं आणि त्या दिशेनं वाहू लागतं. रामभरोसेच्या मनात लपून बसलेल्या त्या नाकखुपशा वृत्तीनंही नवा मार्ग शोधून काढला आणि ती रामभरोसेच्या कानाच्या दिशेनं सरकली. म्हणजे कुणाविषयी कुणी काही बोललं की ते लगेचच जाऊन ते त्या माणसाला सांगून टाकायचं. मग त्यातून गैरसमज होऊन त्या दोघांत भांडणं सुरू झाली की रामभरोसेला मजा वाटू लागली. आनंद घेण्याचा एक नवा मार्ग त्याच्या कानांनी त्याला दाखवून दिला. आता लोक त्याला 'हलक्या कानाचा' म्हणून 'रामभरोसे कानहलके' म्हणू लागले. त्याच्याही खूप सुरस कथा आहेत-

आबुराव आणि बाबुराव यांच्यात एकदा खूप भांडण झालं. आबुरावनं नवी चप्पल घेतली होती. आबुराव सकाळी मारुतीच्या मंदिरात दर्शनाला गेला तेव्हा मंदिराच्या दारातून त्याची नवी चप्पल कोणीतरी पळवली. दोन दिवसांनी आबुरावला ती बाबुरावच्या पायांत दिसली, पण बाबुराव म्हणत होता की त्याने ती विकत घेतली आहे. यावरून दोघांत भांडण सुरू झालं आणि ते रामभरोसेकडे आले. आबुरावने ती चप्पल केवढ्याला घेतली, कुणाकडून घेतली, बाबुरावनं कुणाकडून खरेदी केली अशी चौफेर चौकशी रामभरोसेनं सुरू केली. बोलता बोलता आबुराव म्हणाला, ''मी परवा संपतच्या नकट्या मुलीसाठी मुलगा बघायला शेजारच्या गावी गेलो होतो, तिथं मी ही चप्पल विकत घेतली होती, आपल्या गावात अशी चप्पल मिळतच नाही.''

झालं, हे वाक्य ऐकताच रामभरोसेचे कान टवकारले गेले आणि सावध झाले. दोघांच्या भांडणात त्याला आता अजिबात रस राहिला नाही. ''काय लहान मुलांसारखे भांडता रे तुम्ही? 'एक आठवडा आबुराव चप्पल घालेल आणि एक आठवडा बाबुराव घालेल' असा माझा निवाडा आहे.'' असं सांगून त्यानं दोघांनाही

वाटेला लावलं. दोघांनाही हा निकाल पटला नाही, परंतु रामभरोसेची नियुक्ती राजानेच केली होती, त्यामुळे तो निवाडा मान्य करण्याशिवाय पर्यायच नव्हता.

आबुराव-बाबुराव निघून गेले, रामभरोसे खूश झाला होता. बोलता बोलता आबुरावनं संपतच्या मुलीचा उल्लेख 'नकटी मुलगी' असा केला होता. केव्हा एकदा ते संपतला सांगून टाकतो असं रामभरोसेला झालं होतं. ऐकलेल्या माहितीमुळे जड झालेले कान हलके करून टाकण्याची त्याला घाई झाली होती. पायांत चपला सरकवून तो लगेचच संपतच्या दुकानाकडे निघाला. संपत गुळावर जमलेल्या माशा हाकलत किराणा दुकानाच्या गल्ल्यावर बसलेला होता. रामभरोसे त्याला म्हणाला, मला छटाकभर गूळ फुकट देणार असशील तर तुला एक खास माहिती देतो मी. ती तुझ्या खूप कामाची माहिती आहे. संपतची उत्सुकता चाळवली, त्यानं नोकराला सांगून लगेचच उत्तम दर्जाचा छटाकभर अंकापल्ली गूळ पळसाच्या पानात बांधून त्याला दिला. रामभरोसेनं त्याला विचारलं, ''तो आबुराव तुझ्या मुलीसाठी वरसंशोधन करत आहे ना?'' संपतनं होकारार्थी मान हलवली. रामभरोसे त्याच्या कानांशी लागत म्हणाला, ''अरे, पण तो तर सगळ्यांना सांगतो आहे की संपतची मुलगी नकटी आहे. बघ बाबा, मी आपलं तुला सांगायचं काम केलं.''

एवढं बोलून रामभरोसे तिथून निघाला. त्याच्या कानांना आता हलकं हलकं वाटू लागलं होतं. जे काही ऐकलं ते सांगून टाकलं की त्याचे कान हलके होतं, तसेच आताही झाले होते. संपत लगेचच दुकान बंद करुन आबुरावच्या घरी भांडायला निघाला असेल या कल्पनेनं रामभरोसे खूश झाला होता.

संपत आणि आबुराव यांच्यात कसे तुंबळ शब्दयुद्ध जुंपले असेल याची कल्पना करत रामभरोसे मजेत रस्त्यानं निघाला होता. गावात दुधाचा रतीब घालणाऱ्या नामदेवच्या घरासमोरून तो चालला होता. नामदेवच्या अंगणात दोन म्हशी आणि एक गाय बांधलेली होती. गायीच्या पाठीला हात लावून तिला नमस्कार करावा म्हणून तो थोडा जवळ गेला तर घरातून नामदेव आणि त्याच्या बायकोमधील संवाद रामभरोसेच्या कानीं पडला-

''अहो, सावकाराच्या घरून निरोप आला आहे, आज दोन शेर दूध जास्त हवं आहे त्यांना.''

''अगं पण कसं देणार? दीड शेर शिल्लक आहे फक्त.''

''कसं म्हणजे काय? अर्धा शेर पाणी घाला दुधात. सावकाराला थोडीच कळणार आहे पाणी घातल्याचं? त्यांना सांगा गायीचं दूध असल्यामुळे थोडं पातळ आहे. आलेली लक्ष्मी परत कशाला पाठवता?''

रामभरोसेचं काम झालं. त्याचे कान पुन्हा जड झाले. सावकाराला हे रहस्य सांगितल्याशिवाय ते हलके होणार नाहीत म्हणून तो लगबगीनं सावकाराच्या वाड्याकडे निघाला. नामदेव दूध घेऊन तिथं पोहोचण्यापूर्वीच त्याला सावकाराकडे पोहोचायचं होतं. तेवढ्यात राजाचा एक दूत घोड्यावरून जाताना त्याला दिसला. 'मला जरा सावकाराच्या वाड्यावर सोड' अशी विनंती रामभरोसेनं त्याला केली. रामभरोसे राजाचाचा सेवक असल्याने दूताने त्याची विनंती मान्य केली.



रामभरोसे घोड्यावर बसला आणि दूतासोबत गप्पा मारू लागला. दूत कुठे गेला होता, कोणाचा निरोप घेऊन गेला होता अशा नसत्या चौकशा तो करू लागला. आधी दूतानं फार तोंड उघडलं नाही, परंतु अखेर रामभरोसेच्या गोड बोलण्याला तो बळी पडला आणि म्हणाला, ''मी खरं ते सांगतो, पण कुणाला कळायला नको ते.''

''सांग सांग...लवकर सांगा मला.'' रामभरोसेचे कान ऐकायला आतुर झाले होते. नामदेवच्या दुधाचं रहस्य सांभाळता सांभाळता जड झालेले त्याचे कान आणखी एक गुपित ऐकण्यासाठी तयार झाले होते. राजदूत म्हणाला, ''आपल्या राणीसाहेब आहेत ना, त्यांचा मी खास माणूस आहे. राजाच्या खजिन्यातले थोडे थोडे हिरे, मोती आणि सोन्याचे दागिने त्या चुपचाप काढतात आणि त्यांच्या माहेरी पाठवतात. ते पोहोचवण्याचे काम मी करत असतो. कुणाला सांगू नकोस हे, नाहीतर राजा मला फाशीच देईल.''

''मी कशाला सांगणार आहे कुणाला? मला या नसत्या भानगडी करायला मुळीच वेळ नाही. तुला तर माहीतच आहे, राजानं माझ्याकडे तंटे सोडवायचं काम दिलेलं आहे. माझा दिवस जातो लोकांची भांडणं सोडवण्यात..तू अगदी निर्धास्त रहा, माझा उजवा कान कुठलीही गोष्ट ऐकतो आणि डाव्या कानानं सोडून देतो.'' असं रामभरोसे त्या दूताला म्हणाला खरा, पण आतून

त्याला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. 'वा वा...आणखी एक रहस्य कळलं आपल्याला, तेही थेट राणीसाहेबांचं' असा विचार करत तो पुढील चित्र रंगवू लागला.

सावकाराचं घर आलं तेव्हा रामभरोसे घोड्यावरून खाली उतरला आणि त्याने दूताचे आभार मानले. त्याच्याकडे चकित होऊन पाहत दूत म्हणाला, ''अरे तुझे कान जड होऊन खाली लोंबल्यासारखे का दिसत आहेत? काय झालं तुझ्या कानांना?''

''छे, रे, काहीही काय सांगतोस, तसेच आहेत माझे कान आधीपासून,'' असं म्हणत रामभरोसे सावकाराच्या वाड्यात शिरला. नामदेव दुधात पाणी घालणार आहे ते थेट सावकारालाच सांगावं, म्हणजे मजा येईल असा तो विचार करत होता, परंतु त्याची निराशा झाली. सावकार घरी नव्हता, तो व्यापाराच्या निमित्तानं शेजारच्या गावी गेला होता. सावकाराच्या बायकोला हे सांगण्यात काही गंमत नव्हती. ''मी दुपारी येतो सावकाराला भेटायला, थोडं काम आहे,'' असं सांगून तो परत फिरला. आता त्याचं त्यालाच जाणवू लागलं होतं की, आपले कान थोडे जड झाले आहेत. हलक्या कानांनी दोन दोन रहस्यं धरून ठेवली होती, त्याचं ओझं झालं होत त्याला. सावकाराला तर दुपारी गाठता येईल, पण राजाला कसं गाठावं, राणीच्या चोरीविषयी त्याला कसं सांगावं यावर तो मंथन करू लागला.

विचार करत करत रामभरोसे त्याच्या नेहमीच्या जागेवर जाऊन बसला, तो त्याला संपत आणि आबुराव येताना दिसले. दोघांत वाद होऊन तो सोडवायला ते आपल्याकडे येत असावेत हे त्यानं ताडलं. आपण मघाशी आपले कान हलके केले, त्यातून या दोघांत मस्त जुंपली या कल्पनेनं रामभरोसे खूश झाला, पण आता पुन्हा एकदा जड झालेले कान त्याला त्रास देत होते. संपत आणि आबुराव भांडत भांडतच आले.

''माझी मुलगी असेल नकटी, तुला काय करायचं त्याच्याशी?'' असं संपत रागारागानं विचारत होता. तर '' मी असं बोललोच नाही, मी स्वतःच नकटा असताना तुझ्या मुलीला मी कशाला नकटी म्हणेन?'' असं आबुराव त्याला सांगत होता. रामभरोसेच्या पुढ्यात आल्यावर मात्र दोघेही गप्प झाले आणि आश्चर्यानं त्याच्याकडे पाहू लागले. संपत म्हणाला, ''अरे रामभरोसे, तुझ्या कानांना काय झालंय? ते असे लोंबले का आहेत?''

आत्ता आत्ताच लांब नाकाच्या संकटातून आपण बाहेर पडलो, आता ही कानांची नवी भानगड काय निर्माण झाली? असा विचार मनात येऊन रामभरोसे आता खरंच घाबरला. कसेतरी दोघांचे भांडण सोडवून तो तडक घरी गेला. त्याची आईही त्याला पाहताच ओरडली, ''राम्या, तुझ्या कानांचं हे काय झालंय?''

रामभरोसेनं आरशात पाहिलं तर त्याच्या जड झालेल्या कानांची पाळी लोंबकळत खांद्याला येऊन भिडली होती. रामभरोसे आईला म्हणाला, ''दुपारी सावकाराकडे जाईन आणि मग तिथून राजाकडे जाईन. त्याशिवाय कान हलके होणार नाहीत माझे.'' आपल्या पोराचं हे रूप पाहून आई मात्र फारच काळजीत पडली होती.

(रामभरोसेचे कान हलके झाले का? या प्रश्नाचं उत्तर पुढील भागात)

**संपर्क– ९८९२४१९२६७**

# सहलीला जाऊ

चला मुलांनो सहलीला जाऊ
सोबतीने अवघा महाराष्ट्र पाहू

किल्ले, झाडे, प्राणी, पक्षी पाहू
पाहू नदी, तलाव, समुद्र, कालवे
निसर्गातील अद्‌भूत जादू पाहू
आकाशी लुकलुकते काजवे

शिवनेरी पाहू, रायगड पाहू
पाहू स्वराज्याची राजधानी
न भूतो न भविष्यती राजा
छत्रपती शूर शिवबावानी

कोकण पाहू, मराठवाडा पाहू
पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खान्देश
गांधी, टिळक, डेबू, तुकडोजींचा
विविधतेत एकात्मतेचा संदेश

ज्योतिर्लिंग, शक्तिपीठे पाहू
पाहू गणपती अष्टविनायक
इतिहासातील वंशावळीत
मगध, राष्ट्रकूट, चालुक्य

नाथसागर पाहू, लोणार पाहू
पाहू अजंठा, वेरूळ लेणी
महाराष्ट्राच्या परंपरेत गाणी
अभंग, भारुडे, पोवाडे, गवळणी

पाहू महाराष्ट्रातील वैशिष्ट्ये
पाहू आळंदी आणिक देहू
ऐतिहासिक मातृभूमीसाठी
गर्जा महाराष्ट्र माझा गाऊ

घनशाम सावरकर
संपर्क ९४०४१८९३२३



जसबीर भुल्लर


मराठी अनुवाद – पृथ्वीराज तौर

# आजूबाजूची माणसे

मी अगोदरपेक्षा थोडा मोठा झालो होतो. तरी अजून लहानच होतो.

माझ्या सभोवती असलेलं जग रंगीबेरंगी आणि सुंदर होतं. अपार कुतूहलाने मी ते न्याहाळत होतो. माझ्या त्या जगात पुष्कळ माणसे होती.

ज्या गल्लीत आमचं घर होतं ती पुढे जाऊन बाजाराला भेटायची. बाजारात तिथेच कुठेतरी छत्रीची विहीर होती. तिच्या बाजूला एक म्हातारा बाबा सतत बसलेला असे. तो विहिरीतून पाणी काढायचा आणि नळ असलेल्या टाकीमध्ये



ओतायचा. तिथून येताजाता लोक तोटी फिरवायचे आणि हाताची ओंजळ करून पाणी प्यायचे. पाणी न पिता तिथून कुणी इकडेतिकडे जायचचेच नाही. त्या विहिरीचं पाणी गोड आणि थंडगार असे. मीही उगीच फिरत फिरत तिकडे जात असे आणि तिथे जाऊन पाणी पीत असे. ओंजळ करून पाणी पिताना त्याचे ओघळ माझ्या कोपरापर्यंत येत आणि तिथून पाणी टपटप खाली पडत राही.

विहिरीच्या शेजारी असलेल्या दुकानात कृपाण तयार होत असे. तिथे केवळ दोन लोक असत. ते बापलेक होते. भट्टीपुढे बसवून ते लोखंड गरम करत, आणि त्याला कृपाणाचा आकार देण्यासाठी खालून वरून ठोकत राहत. त्यांच्या शरीरावरून दिवसभर घाम वाहत राही. कृपाण तयार झाल्यानंतर ते तिला काळ्या मातीनं उजळून काढत. कृपाण चमचम करत चमकू लागे.

विहिरीचं पाणी पिल्यानंतर मी दुकानाच्या बाहेर उभं राहून त्या लोकांना त्यांचं काम करताना बघत राही. काळ्या मातीत काम करताना ते काळेकाळे होत जात.

कृपाणवाल्याला खेटून शरबतचं दुकान होतं. शरबतच्या दुकानातून नेहमी थंड आणि गोड सुगंध येत असे. मी दुकानाच्या बाहेर उभं राहून माझ्या फुप्फुसांत तो सुगंध पुन्हा पुन्हा भरून घेत असे.

दुकानाच्या बाहेर एक थोराड माणूस उघड्या अंगानं बसलेला असे. त्याच्या अंगावर केसच केस होते. त्याचं सगळं शरीर घामोळ्यांनी भरलेलं होतं. एक पोरगा कापडात बर्फ गुंडाळून त्याच्या पाठीवर, पोटावर फिरवत राही. बर्फामुळे त्याची आग कमी होत असावी. त्याला तेव्हा इतकं छान वाटत असे की तो डोळे बंद करून घेई. त्याच्या चेहऱ्यावर संतोष झाल्यासारखे भाव असत. मग तो तिथे बसलेल्या माणसांशी गप्पा मारत राही.

त्याच्या हातात चावून चावून ब्रशसारखी झालेली लिंबाची काडी असे. जेव्हा त्याला खाज सुटे तेव्हा तो तिनेच आपली पाठ खाजवू लागे.

गल्लीच्या कोपरावर एक कंगवेवाला होता. त्याच्या जवळ लाकडाचे छोटेमोठे तुकडे असत. त्यापासून तो फणी तयार करत असे. तो खूप छोट्या आरीने लाकडावर बारीक बारीक फटी तयार करी. ग्राहकाच्या मागणीअनुसार तो कमी जास्त दातऱ्यांची फणी बनवत असे. कंगवा तयार झाल्यानंतर तो वाळूनं त्याला घासून काढी आणि मग स्वच्छ करून ती ग्राहकाला देई.

त्या बाजारात अजून खूप दुकानं होती. पण मी जास्त दूर जात नसे. मला हरवून जाण्याची भीती वाटे. काही दुकानं अशी होती की मला त्यांच्याविषयी उत्सुकता नव्हती.

दुपार झाली की वळणावरून एक कुल्फीवाला गल्लीत येत असे. तो आपला गाडा काही अंतरावर घेऊन जाई आणि मग थांबे. ''मलाईदार कुल्फी, थंडगार कुल्फी.'' तो विशिष्ट लयीत आवाज देत असे. मी जवळजवळ रोजच त्याच्याकडून कुल्फी विकत घेऊन खात असे. मला खर्चासाठी घरातून दररोज एक पैसा मिळत असे. कुल्फीही एका पैशालाच मिळत असे.

गल्लीत एक छाबडीवालासुद्धा फेरी मारत असे. त्याच्या टोपलीच्या दोन भागांत निरनिराळ्या पिशव्या असत. त्यात मुरमुरे, लाह्या, मखाना, भाजलेले गहू, चणे, रेवड्या, खारे शेंगदाणे,

फुटाणे असत. तो म्हातारा होता. त्याची दाढी खूप लांब होती. आवाज दिल्यानंतर तो छाबडी खांद्यावरून खाली घेई आणि तिला एका बैसाखीचा आधार देई. त्याचा आवाज अगदी दूरवर ऐकू जाई. तो एक एक करत सगळ्या जिनसांची नावे घेई. नाव घेताना तो शक्य तितके उच्चार दीर्घ करत असे. जर कुल्फीवाला आला नाही तर मग मी छाबडीवाल्याकडून काही ना काही विकत घेत असे.

कधीकधी एक जळूवाला गल्लीत आवाज देताना आढळे. ''जळू लावा जळू,'' तो म्हणे. ''ओ भाऊ, जरा थांबा.'' एके दिवशी पालीच्या आईनं त्याला आवाज दिला. पाली माझ्याच वयाचा होता. त्याचं कुटुंबही त्याच इमारतीमध्ये राहत असे ज्या इमारतीत आम्ही राहत असू. पालीच्या शरीरावर खूप पुटकुळ्या होत्या, कदाचित त्याच्या घामोळ्या पिकल्या असतील. पालीला पकडून त्याच्या आईनं त्याला जळूवाल्याच्या पुढ्यात उभं केलं. ''याचं रक्त नासलं का बघा बरं.''

पालीच्या पुटकुळ्या जळूवाला सूक्ष्मपणे बघत म्हणाला. ''तसंच आहे, रक्त नासलं असंच दिसतंय'''

'मग'

''जळू लावू का?''

''पण लेकराला आराम पडेल नं?''

''मग? का नाही पडणार?'' जळूवाल्यानं त्याच्या बंद डबीतून एक जळू काढली आणि पालीच्या पिंढरीवर चिटकवली.

सगळी मुलं पाली कसा बरा होत आहे? हे बघण्यासाठी त्यांच्या भोवती जमा झाली.

पण ज्या दृश्याची आम्हांला अपेक्षा होती तसं काहीच घडलं नाही. आम्हांला वाटत होतं की पालीच्या पुटकुळ्या कमी कमी होत एकदम नाहीशा होतील. पण छोटी जळू त्याच्या पायाला पकडून त्याचं रक्त पीत राहिली. जेव्हा ती रक्त पिऊ पिऊ एकदम मोठी झाली तेव्हा घसरून खाली पडली. जळूवाल्यानं तिला जमिनीवरून उचललं, डबीत ठेवलं आणि डबी पुन्हा बंद केली.

''ताई, पोराचं रक्त जास्तच नासलं आहे. मी पुढच्या हप्त्यात पुन्हा येतो, तेव्हा दोन-तीन जळू लावाव्या लागतील.''

''बरं बरं. पण पोराला आराम पडेल नं?''

हो म्हणत जळूवाला उपचाराचे पैसे घेऊन निघून गेला.

त्या काळात हे एवढंच माझं जग होतं. नंतर हळूहळू आजूबाजूची माणसे पांगली. दुकानं बंद राहू लागली. विहिरीजवळची टाकी पाण्याविना कोरडी झाली. तोटी असलेल्या त्या टाकीत पाणी भरणारा म्हातारा बाबा दिसेनासा झाला. कुल्फीवाल्यानं गल्लीत येणं बंद केलं. छाबडीवालाही हरवला. जळूवाला पुढच्या हप्त्यात येतो म्हणून गेला. पण तो पुन्हा कधीच परतला नाही. गल्ली सुनीसुनी होत गेली.

एके दिवशी घरात मोठ्यांची चर्चा ऐकू आली. ''एका नवा देश तयार होणार आहे.''

एक नवा देश का तयार होणार आहे? मला काहीच कळालं नाही. कुणी सांगितलं नाही. पण मला इतकंच समजलं की जेव्हा एखादा नवा देश तयार होत असतो त्या वेळी कुल्फी आणि कडू आंबट गोळ्या विकत मिळणं एकदम बंद होऊन जातं. आणि ही जरासुद्धा चांगली बाब नाही.

**संपर्क : ९५७९१३६४६६**

# निसर्ग ...

जेव्हा येतो आई-बाबांचा राग
तेव्हा मनाशी बांधतो चंग
अभ्यास-बिभ्यास सोडून मग
निसर्गात होतो मी दंग ।। धृ.।।

मनातले सारे मी
फुलपाखरांना सांगतो
पानाफुलांशी बोलत
बागेतून मी धावतो
आनंदाला घेतो कवेत
वेचून एक एक रंग ।। १ ।।

वाहणाऱ्या झऱ्यांमधले
पाहतो दुधासारखे पाणी
उडणाऱ्या तुषारासोबत
गातो गोड गोड गाणी
उधाण येते आनंदाला
पाहुनी पाण्यातले तरंग ।। २ ।।

आकाशाशी करतो मी
मनातल्या गुजगोष्टी
फुंकर मारत म्हणे वारा
कशास होतो दुःखी कष्टी
उंच उंच उडतो मग
माझ्या मनीचा छान पतंग ।। ३ ।।

पळून पळून इकडेतिकडे
फारच मी दमून जातो
मन होते ताजेतवाने
घर गाठताना थकून जातो
आईच येते खूप आठवण
जेव्हा दुखते अवघे सारे अंग ।। ४ ।।

डॉ. विजयकुमार माने
संपर्क ९८२२६११७१





राजश्री राजवाडे – काळे

# ‘बुद्‌धी’चा लाडू

अन्वय आईसोबत घरी आला तेव्हा त्याला कधी एकदा पिशवीतून बुंदीच्या लाडवांचा बॉक्स उघडेन आणि त्यातला लाडू खाईन असं झालं होतं. पायांतल्या चपला काढून नाही होत तोच तो आईच्या मागे लागलाच, ‘‘आई दे ना गं लवकर बुद्‌धीचा लाडू, खूप भूक लागल्ये,’’ तशी आई म्हणाली, ‘‘आधी हातपाय धुवून घे, कपडे बदल, तोपर्यंत मी देवासमोर लाडू ठेवते, मग तू देवाला नमस्कार कर आणि लाडू खा हां.’’ लवकर लाडू खायला मिळावा म्हणून अन्वय लगेच पळाला.

आज अन्वयला आंतर शालेय चित्रकला स्पर्धेत पहिलं बक्षीस मिळालं होतं. आई आणि अन्वय त्याच बक्षीस समारंभावरून आले होते. पहिलं बक्षीस मिळाल्याबद्दल आई घरी येतानाच अन्वयला मिठाईच्या दुकानात घेऊन गेली तेव्हा अन्वय नेहमीप्रमाणे म्हणालाच, ‘‘आई, पेढ्याबदली बुद्‌धीचा लाडू घेतला तर चालेल का?’’ समजायला लागल्यापासूनच अन्वयला बुंदीचे लाडू अतिशय प्रिय. बुद्‌धीचे नाही तर ‘बुंदीचे लाडू’ असं म्हणतात हे कितीदा सांगितलं तरी पहिले पाढे पंचावन्न! अन्वय सवयीप्रमाणे बुद्‌धीचे लाडू म्हणून मोकळा व्हायचा. आजही त्याचं आपलं ‘बुद्‌धीचे लाडू’ हेच पालुपद सुरू! अन्वय पटकन हातपाय धुवून आला, देवाला नमस्कार केला आणि देवासमोरच्या वाटीमधला लाडू गट्टम केला. इतक्यात मित्रांच्या हाका ऐकू



आल्यावर, ''आई मी खेळायला जातो'' असं म्हणून खेळायला धूम ठोकली.

थोड्याच वेळात इयत्ता आठवीत शिकणारी अन्वयची नेहाताई क्लासमधून घरी आली, नेहाताई आली तेव्हा चिडलेलीच होती, आल्या आल्या रागाने आईला म्हणाली, ''आजपण तू अन्वयच्याच आवडीचे बुंदीचे लाडू आणलेस ना? तू माझ्या आवडीचं काही आणतंच नाहीस, तोच तुझा लाडका आहे, भेटला अन्वय मला, खेळता खेळता माझ्याकडे आला आणि म्हणाला चोंबडा, 'नेहाताई, बुद्धीचे लाडू आणलेत,' अन्वयची नक्कल करत नेहाताई रागारागाने बोलत होती, आणि मलाही भूक लागल्ये त्याचं काय?''

''नेहा अगं पोहे केलेत ना तुझ्यासाठी, हे बघ अन्वयला आंतर शालेय चित्रकला स्पर्धेत पहिलं बक्षीस मिळालंय..,'' आईचं बोलणं मध्येच तोडत नेहा म्हणाली, ''सांगितलं मला हे त्याने, त्याला बक्षीस मिळालं म्हणून आज त्याच्या आवडीचे बुंदीचे लाडू आणलेस, मग मागच्या आठवड्यात का आणले होतेस? त्याला कमी मार्क्स मिळाले, रडू येत होतं, म्हणून त्याचा मूड चांगला व्हावा म्हणून, हो ना? म्हणजे त्याने काही चांगलं केलं की त्याचं कौतुक आणि वाईट केलं की पुन्हा त्याचा मूड येण्यासाठी त्याचंच कौतुक? मला त्याच्यापेक्षा खूप चांगले मार्क्स मिळतात तरी तुम्ही त्याचंच कौतुक करता, तोच जास्त लाडका आहे तुमचा, म्हणे चित्र छान काढतो, अभ्यास जास्त महत्त्वाचा आहे, तरी त्याच्या चित्रांचं कौतुक जास्त?'' नेहाचं हे बोलणं ऐकून आईला धक्काच बसला आणि वाईटही वाटलं. जशी इतर बहीण भावंडांची होतात तशी अन्वय आणि नेहाची भांडणं होत होती, मग अन्वयची रडारडीसुद्धा होती पण नेहाच्या मनात इतका राग असेल हे प्रथमच जाणवलं आईला. वाटलं, आपल्या छोट्या भावाला बक्षीस मिळाल्याबद्दल त्याचं कौतुक करायचं सोडून ही मुलगी असं बोलते? नेहा अभ्यासात हुशार होती, ती पहिल्यापासूनच आपला आपला आवडीने अभ्यास करायची, तिचा स्वभावही तसा पहिल्यापासून स्वावलंबी. क्लासला, शाळेत वगैरे ती आपली आपली सायकलनंच जायची. तिच्याकडे खूप काही लक्ष देऊन, तिच्या मागे लागून तिचा अभ्यास वगैरे करून घेणं असं कधी करावंच लागलं नाही पण अन्वयचं मात्र अगदी उलट होतं, त्यातच तो शेंडेफळ! सतरा वेळा, 'अभ्यासाला बस' असं सांगितल्यावर मग कुठे स्वारी पुस्तक उघडणार आणि पुस्तक उघडूनसुद्धा ते वाचण्याबदली धड्यामधलं चित्र त्याचं लक्ष वेधून घेणार, आणि मग ते चित्र काढल्याशिवाय त्याला चैन पडणार नाही आणि एकदा का ते चित्र काढून झालं की मग स्वारीच्या अभ्यासाला सुरुवात होणार. त्यामुळे सगळं लक्ष अन्वयकडेच असायचं. पण आज मात्र आईला जाणवलं की नेहाच्या अभ्यासाकडे लक्ष द्यायची गरज नसली तरी तिच्या विचारांकडे लक्ष द्यायची फार गरज आहे. आईला जाणवलं की आत्ता आपलंही चुकलंच, नेहाला बुंदीचे लाडू अजिबात आवडत नाहीत म्हणून तिच्याकरिता दुसरी मिठाईसुद्धा आणायला हवी होती, भले तिला गोड जास्त आवडत नसलं तरी तिला आनंद झाला असता, आता पुन्हा ही चूक करायची नाही आणि शांतपणे तिच्याशी बोलायचीही गरज आहे असा विचार करून आई नेहाला सांगून भाजी आणायला बाहेर पडली.

आई बाहेर असतानाच अन्वय खेळून आला

आणि पुन्हा एकदा बॉक्समधला बुंदीचा लाडू घेत नेहाताईला विचारलं, ''ताई तुलापण हवाय बुद्धीचा लाडू?,'' हे ऐकून चिडलेली नेहाताई म्हणाली, ''मला गरज नाहीये बुद्धीच्या लाडवाची, आईने तुझ्याकरिता हे बुद्धीचे लाडू का आणलेत माहित्ये?,'' अन्वय निष्पापपणे म्हणाला, ''मला बक्षीस मिळालं ना आणि मला आवडतात म्हणून,'' त्यावर त्याची नेहाताई म्हणाली, ''हट्, म्हणून नाही काही, हे बुद्धीचे लाडू खाल्ले ना की बुद्धी वाढते, मग हुशार होतो आपण आणि चांगले मार्क्स मिळतात, तुला कमी मार्क्स मिळतात ना म्हणून आई तुझ्यासाठी हे बुद्धीचे लाडू आणते सारखे, तुझी बुद्धी वाढायची गरज आहे, मला नाही गरज हे बुद्धीचे लाडू खाण्याची, तुलाच गरज आहे, तूच खा, आणि हो छान चित्र काढतोस ना त्याचा काही उपयोग नाहीये. खरं तर, आईबाबा उगाच तुला आनंद व्हावा म्हणून कौतुक करतात, अभ्यासच जास्त महत्त्वाचा आहे खरा, खा खा बुद्धीचा लाडू, म्हणजे अभ्यास येईल तुला.''

हे ऐकून अन्वयला रडूच फुटलं. इतक्यात आई आली आणि सोबत बाबासुद्धा आले ऑफिसमधून. इतकं मोठं बक्षीस मिळालं आणि तरी हा मुलगा रडतो आहे हे पाहून आश्चर्यच वाटलं बाबांना. मग अन्वयने रडत रडत नेहाताई जे बोलली ते सगळं सांगितलं आईबाबांना. भाजी घेऊन घरी येताना आईला बाबा भेटले आणि तिने तेव्हाच त्यांच्या कानांवर घातलं होतं की नेहाला समजवायची गरज आहे. बाबा अन्वयला जवळ घेऊन म्हणाले, ''अरे असं काही नाही, तुला माहित्ये का जसं ताई म्हणते की तिला चांगले मार्क्स मिळतात तशी तुला छान चित्रं काढता येतात, आणि ताई तुझ्यापेक्षा इतकी मोठी असूनही तिला तुझ्यासारखी छान चित्रं काढता येत नाहीत, आणि नेहाताईने तुझी गंमत केली. तू सारखं बुंदीच्या लाडवांना बुद्धीचा लाडू म्हणतोस ना म्हणून. पण तुला नेहाताईने केलेल्या गमतीचं वाईट वाटलं ना म्हणून. मग आता चांगला खराखुरा बुद्धीचा लाडू मीच तिला देतो थांब,'' असं म्हणून बाबा नेहाताईसोबत बोलायला गेले आणि आईनेही अन्वयला जवळ घेतलं आणि त्याची समजूत काढली. थोड्या वेळाने नेहाताई आणि बाबा अन्वयजवळ आले, नेहाताईने अन्वयला जवळ घेतलं आणि म्हणाली, ''सॉरी अन्वय, मलाच गरज होती बुद्धीच्या लाडवाची आणि बाबांनी तो मला दिला, आता मी पुन्हा कधीच तुला चिडवणार नाही, खरंच सॉरी, तू अशीच छान छान चित्रं काढत जा,'' असं म्हणत नेहाताईनेसुद्धा बुंदीचा लाडू खाल्ला.

बाबांनी नेहाला समजावलं होतं की, प्रत्येक माणूस वेगळा असतो, प्रत्येकाची आवडनिवड वेगळी असते, कोणाला काही विषय आवडतात तर कोणाला काही! त्यामुळे एखाद्याला जे आवडत नाही आणि जमत नाही त्यावरून चिडवायचं नाही, आपल्याला जे येतं त्यावर गर्व तर बिलकूल करायचा नाही, त्याचप्रमाणे चित्रकला काय किंवा गणित, एखादा खेळ, यापैकी कसली आवड उच्च आणि बाकी कमी महत्त्वाचं असं काहीही नसतं, हा सगळा बाबांनी दिलेला बुद्धीचा लाडू नेहाने खाल्ला आणि तो तिला पचलासुद्धा! आईनेही मनोमन ठरवलं की ती जेव्हा जेव्हा अन्वयच्या आवडीचे 'बुद्धीचे लाडू' आणेल तेव्हा तेव्हा नेहाकरिता वेगळी मिठाईसुद्धा आणणार.

**संपर्क ९९२२९५२४५०**

# सत्य शिव अन् सुंदरता

कोटी कोटी कंठांत निनादे एकच मंगल गान
भारत देश महान, अमुचा भारत देश महान

सप्त नद्यांनी सुजलां सुफलां ही भारतभूमी
हिरवी राने, हिरवे डोंगर धनधान्या ना कमी
ध्वज तिरंगा प्राण, अमुचा ध्वज तिरंगा प्राण

राम-कृष्ण प्रभू पदस्पर्शाने पावन ही धरती
संकटसमयी धाऊन येते विश्व नियंत्रक शक्ती
उत्कर्षाचे, आधुनिकतेचे आम्हांला वरदान

जगात अवघ्या श्रेष्ठ आमुची भारतीय संस्कृती
अनेकतेतही असे एकता ऐसी अमुची कृती
सत्य, शिव अन् सुंदरतेचा आम्हांला अभिमान

दत्तात्रय जोशी





सुरेश शिंगटे

# खळ्यावर ऐकलेल्या आजीच्या गोष्टी

पन्नास वर्षांपूर्वी आजच्यासारखी शेती करण्यासाठी औजारे नव्हती. बैलांच्या मदतीने आणि सुताराने बनवलेल्या लाकडी औजारांनी शेती केली जायची. धान्याची मळणीसुद्धा शेतात खळे बनवून केली जायची. आम्हां लहान मुलांना त्या वेळी खळ्यावर खेळायला, रात्रीचे शेतात झोपायला, आजीच्या छान छान गोष्टी ऐकायला खूप मजा वाटायची.

गहू, हरभरा, ज्वारी यांची काढणी झाली की पौष, माघ महिन्याच्या दरम्यान शेतात खळी पडायची. सर्व शेतातले धान्य एकत्र एका शेतात

यायचे, आणि सवडीने मळले जायचे. मग गुरांच्यासाठी मांडव आणि माणसांच्या साठी ऊन-वाऱ्यापासून संरक्षणासाठी खोप घातली जायची. म्हातारी माणसं खळ्यावर धान्याची राखण करायची, आणि तरणी माणसं शेतात काम करायची. आम्ही लहान लेकरे मात्र शाळा सुटली की खळ्यावर वारा पिलेल्या वासरागत उंडारायचो आणि संध्याकाळी आजीच्या गोष्टीची वाट पाहायचो.

त्या वेळी आम्हांला टीव्ही किंवा मोबाइलमधील करमणुकी नव्हत्या. किंवा पोगो चॅनेल व छोटा भीमसारखे टी.व्ही. कार्यक्रमही नव्हते. आजी हीच आमचे सर्व काही होती. आम्हांला आजी लाभली होती हे आमचे परम भाग्य. तिच्या गोष्टीमुळे आमची करमणूक व्हायची आणि तिच्या बटव्यातल्या औषधामुळे आमचे आजार बरे व्हायचे.

माझी आई मला मी चांगला कळता होईपर्यंत कळालीच नाही. आजीनेच माझा सांभाळ केला होता. त्यामुळे बराच काळ मी आजीलाच आई समजायचो, वडील आणि चुलते यांना मोठे भाऊ समजायचो. बऱ्याच दिवसांनी घरात जन्मलेले मी पहिले बाळ म्हणून आजी माझे खूप लाड करायची. पण कळायला लागल्यावर, शाळेत जाऊ लागल्यावर आजीने मला नीट समजावले. मग माझी आई मला आई वाटू लागली.

आजीने कथा-कीर्तनातून ऐकलेल्या किंवा सांगीवांगीतून तिच्याकडे आलेल्या खूप सुंदर गोष्टी आमच्या बालपणी सांगितल्या. कथा रंगवून सांगण्याची अजब कला तिच्याकडे होती. आम्ही ऐकणारे अगदी हरवून जायचो. तिने सांगितलेली लबाड कोल्ह्याची, 'जग बुडाले' ही गोष्ट अजून मला आठवते.

''बरं का बाळांनो! एक कोल्हा नदीच्या मध्यभागी असणाऱ्या खडकाळीत राहायचा. एकदा काय झालं, अचानक वळवाचा पाऊस आला, आणि नदीला पूर आला. खडकाच्या चहूबाजूने पाणी वाहू लागलं.''

''मग कोल्ह्याचे काय झालं आजे?''

सुरक्षित जागा म्हणून कोल्हा दिवसा खडकाच्या खोबदाडीत झोपायचा. पाण्याच्या खळखळाटाने त्याला जाग आली. पाहतो तर त्याच्या चारी बाजूने पाणी. मग त्यानं काठावरच्या गुराख्यांना मोठ्याने हाका मारल्या.

''अरे पोरांनो! जग बुडलं...मला वाचवा... जग बुडलं...मला वाचवा. पोरांना कळेना, जग कसं बुडालं आणि कुठं बुडालं? पण त्यांनी पाण्यात उड्या टाकल्या आणि कोल्ह्याला वाचवलं. काठावर आणून गारठलेल्या कोल्ह्याला शेकवलं. त्याचा गारठा निघून गेला,'' आणि मग एका पोरांनी कोल्होबाला विचारलं.

''आता सांगा ना कोल्होबा जग कसं बुडलं?''

''बाळांनो! पाणी वाढलं. मी पाण्यात वाहून गेलो. म्हणजे मेलोच असतो. म्हणजे माझ्याकरता जग बुडालेच ना? आता तुम्ही मला वाचवलं. माझ्याकरता जग वाचलं. मी आता इथून पुढेही जग पाहीन.''

मग आजी गोष्टीचे मूळ सांगायची. कोल्हा शेवटी अशा कारणामुळे लबाडच ठरला. पण त्याचं एक खरं होतं की, आपण संपलो की आपल्यासाठी जग संपतेच ना? बाळांनो! प्रत्येकाची धडपड हीच असते ना? आपल्यासाठी



जग बुडू नये म्हणून. मग कोल्ह्याला तरी कसा लबाड म्हणायचा? आजीच्या कथेतील पशुपक्षी बोलायचे याचे त्या वेळी आम्हांला कधीच आश्चर्य वाटले नाही.

आजीच्या सुंदर सुंदर कथा ऐकायला आमच्या शेजारच्या खळ्यावरची आमच्यासारखी लहान मुलंसुद्धा यायची, आणि त्यांचे आईवडील त्यांना प्रेमाने पाठवायचे. त्यांना न्यायलाही यायचे. मग तर आजीला चांगल्या चांगल्या गोष्टी सांगायचा चेव यायचा. मग ती रामायण-महाभारतातल्या गोष्टी, पौराणिक राजाराणीच्या गोष्टी, ऐतिहासिक महापुरुषांच्या गोष्टी सांगायची.

आजीच्या गोष्टींत मोठ्यांना अजिबात रस नसायचा. पण आम्ही सहा ते दहा वर्षे वयोगटातली मुले-मुली आवडीने गोष्टी ऐकायचो. गोष्ट सांगायला सुरुवात करताना आजी माझं नाव घेत म्हणायची, ''बरं का सुरीस, एक बापलेक होतं. ते शेतात नांगरट करत होतं. दुपारचा नांगर सोडून झाडाखाली बसलं. वावरातून एक पायवाट जात होती. त्या वाटेने कफनी घातलेला साधू चालला होता. त्याला नांगरटीच्या एका सरीत सोन्याच्या मोहरांनी भरलेला हंडा दिसला. झाडाखालच्या बापलेकांना त्यानं जवळ बोलावलं आणि म्हणाला, 'बाप्पा हो! देवाने बघा तुमच्यासाठी काय धाडले. सोन्याच्या मोहरांचा हंडा. घ्या पटकन.' त्यावर तो बाप त्याला म्हणाला, 'महाराज तुम्हांला दिसला. तुमच्यासाठीच पाठवलाय देवानं.' तर महाराज म्हणतो कसा, 'तुमच्या शेतात आहे. तुमची मालकी.' तर बाप म्हणाला, 'महाराज माझ्या खापरपंज्यानं पंज्याला, पंज्यानं आज्याला, आज्यानं बापाला, बापानं मला, आणि मी पोराला एक मंत्र सांगितला आहे. 'जे श्रमाचं, घामाचं ते आपलं. फुकाचं ते लोकांचं. शेतातल्या मातीत घाम गाळून जे पिकेल ते आमचं''' असं म्हणत तो शेतकरी नांगराकडे निरीच्छ भावनेने पाहून निघून गेला.

''तर बाळांनो! तुम्हांला ही गोष्ट का सांगितली? तुम्हीसुद्धा श्रमाचं, घामाचं घ्यायचं. फुकाचं कुणाचं काहीही घ्यायचं नाही. चोरी करायची नाही.'' आणि आम्ही खरोखर तिच्या या तत्त्वानुसार आयुष्यभर वागत आलो. कुणाचं कधी काहीच चोरलं नाही किंवा घेतलंसुद्धा नाही.

आजीच्या पौराणिक कथाही सुंदर असायच्या. त्यात एक राजा आणि त्याला दोन राण्या असायच्या. त्यात एक आवडती आणि एक नावडती असायची. लहानपणी हे आवडती नावडती काहीच कळायचं नाही. पण आजी अशी काही राजाराणीची गोष्ट रंगवून सांगायची. ऐकता ऐकता आम्हांला पेंग यायची. दुसऱ्या दिवशी मात्र आजी तिथूनच परत ती गोष्ट चालू करायची.

कधी रंगात आलेल्या गोष्टीचा राजा युद्धात मरून जायचा, आणि मग आम्हां मुलांचा विरस व्हायचा. माझा लहान भाऊ, बहीण तर खूप रडायची. मग आजी बटव्यातली जडीबुटी देऊन राजाला जिवंत करायची. पुन्हा नव्याने गोष्ट सुरू करायची. आम्ही सगळे हरखून जायचो.

आजी काही काळ आजोबांच्या बरोबर मुंबईत राहिली. एकदा एका म्हाताऱ्याच्या मागे चाळीतली पोरं लागली होती. आजीच्या बैठ्या घरात तो म्हातारा दडायला आला. म्हणाला, ''माय हो! लेकरे त्रास देऊन रायली मले.'' आजीने पोरांना हाकलले. म्हातारा गोसावी म्हटला. ''माय घास मुटका देती थोडा? भूक लागली.'' आजीनं जेवायला घातलं.

आजीला कीर्तनाचा नाद. रात्री कीर्तनाला गेली. तर सकाळी जेवायला घातलेला म्हातारा कीर्तनाला उभा. आजोबांनी सांगितलं. ''अगं! हा गरिबांचा देव. गाडगेबाबा.'' कीर्तन संपल्यावर आजी लांबूनच गाडगेबाबांच्या पाया पडली. गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा तिने आयुष्यभर जोपासला आणि आम्हांलाही जोपासायला लावून ती जगबुडी झाली.

**संपर्क ९४०३४४४२४३**

मनोज बोरगावकर



# भूत तर दिसलेच नाही पण ...

# कथा सद्‌गुणाची

पुस्तकं घरातच नाही तर काळजातही घर करून बसतात. कित्येक वेळा तर वाटतं राहतं की आपली पुस्तकांशी यारी-दोस्ती झाली नसती लहानपणीच तर जगणं किती रिकामे रिकामे झाले असते आपले. माझा पुस्तकांशी दोस्ताना होण्याचा प्रसंग मात्र फारच गमतीशीर आहे... मुळात मी गेलो होतो भुताला भेटायला... भूत तर भेटलंच नाही पण तेव्हापासून पुस्तकाचं भूत जे मानगुटीवर बसलय ते आजपर्यंत!

त्याचे असे झाले, लहानपणी मी खेड्यात राहायचो. आम्हां पोरांची एक टोळी होती... तिथं आम्ही अनेक उद्योग करायचो. त्यापैकी ऐक म्हणजे नाटकं खेळण्याचा... नाटकं करायची सवय मात्र इकडे शहराकडे आल्यावरच लागली.

आमच्या नाटकांचे मेन थीम असायचे ते म्हणजे भूतं. नाटकात हमखास भूत असायचेच... म्हणजे आम्ही अगदी ऐतिहासिक नाटक केलं तरी त्यात मारून मुटकून भूत घुसवायचो म्हणजे घुसवायचोच. जयराम नावाचा आमचा हरहुन्नरी मित्र भुताचा रोल वठवायचा. गावातली पोरं नाटकं खेळताहेत म्हणून गावातली लोकंही कौतुकानं नाटकं पाहायला यायची.

एकदा जयराम म्हणाला, ‘‘तेच ते भुताचा मेकअप करून लई कटाळा आलाया... खरंखुरं भूत कसं राहतया एक बार अमावस्या बुरजात जाउनशानी बघूच या. मग बघा कसा भुतावानी डिट्टो मेकअप करतो म्या नाटकात!’’

आमच्या गावाशेजारी निझामकालीन बुरूज होता. त्याची ठेवण फारच भारी होती. पायऱ्या चढत चढत वर जायचे... आणि नंतर खाली उतरायचे. खाली सगळा अंधारगुडूप. साधारण साठ-सत्तर फूट उंच असाचा तो. तिथं भुतांचा वावर आहे, रात्री घुंगराचे आवाज येतात अशा गावभर चर्चा होत्या. शेतावर जायचा लोकांना बुरूज ओलांडूनच जावे लागे. बुरुजाशेजारून दिवसाढवळ्या जातानाही लोकं घाबरत. रात्रीची तर बातच सोडा. आता तो बुरूज ढासळून गेलाय नामशेष झालाय. मला मात्र त्या बुरुजाचा आधार वाटायचा. तो जणू गावाचा ‘राखणदारच’ वाटायचा. तो ढासळल्याचे कळाल्यावर माझे डोळे भरून आलेले. गावातला एखादा म्हातारा माणूस गेल्यावर जेवढं दुःख व्हायचे तसेच काहीसे माझे झालेले. असो.

मग हिकमती जयरामच्या म्हणण्यानुसार सगळा प्लॅन ठरला. अमावस्याच्या रात्री बरोबर बारा वाजता जयराम कुत्र्याच्या रडण्याचा आवाज काढणार की मग सगळ्यांनी शाळेजवळ जमायचं. जसजशी अमावस्या जवळ यायला लागली आमच्यातला एकेक भिडू गळायला लागला. शेवटी कसेबसे आम्ही सहा जण उरलो. ठरल्याप्रमाणे अमावस्येच्या रात्री बारा वाजता गच्च अंधारात जयरामने कुत्र्याच्या रडण्याचा आवाज काढला. ठरल्याप्रमाणे आम्ही गुपचूप घरातून बाहेर पडलो. तुम्हांला प्रश्न पडला असेल की, रात्री बारा वाजता दार उघडताना आवाज वगैरे होऊन आई-बाबा कोणी उठलं असेल ना? पण गोम अशी होती की उन्हाळ्याच्या दिवसांत आम्ही सगळेच सरळ बाहेरच झोपायचो त्यामुळे दार वगैरे उघडण्याचा आणि आवाज येण्याचा प्रश्नच नव्हता.

ठरल्याप्रमाणे किर्र अंधारात आम्ही सहा जण शाळेजवळ पोहोचलो. शाळेचा चौकीदार दारू

पिऊन ढर्र झोपला होता. त्यामुळे त्याच्या उशाची बॅटरी काढायला आम्हांला फारसे प्रयास पडले नाहीत.

आम्ही मोठ्या हिमतीने बुरुजाकडे निघालो... जसजसा बुरूज जवळ यायला लागला, आमचे सगळ्यांचे पाय लटपटायला लागले. आतापर्यंत सगळ्यांच्या पुढे असणारा जयराम केव्हाच मागे आलेला अन् सगळ्यात पुढे मी. बॅटरीच्या उजेडात आवाज न करता आम्ही बुरुजाची एकेक पायरी चढायला लागलो. वरची शेवटची पायरी आलेली... मी मागे वळून पाहिलं. सगळ्यांच्या चेहऱ्यांवर मूर्तिमंत भीती आणि दरदरून घाम फुटलेला. मोठ्या धिरानं मी एकेक पायरी उतरायला लागलो. भीती इतकी व्यापून राहिलेली की बाकी सगळया संवेदना बोथट झालेल्या. काही पायऱ्या उतरल्यावर माझ्या लक्षात आलं की जयरामसहित सारेच केव्हाच मागच्या मागे पळून गेलेले. मला दरदरून घाम फुटलेला... भूत वगैरे तर काही नाही पण ती किर्र अंधारातली काळीकुट्ट शांतता अंगावर चाल करून आलेली. मी सुसाट पळत सुटलो ते घरी अंथरुणातच विसावलो. भीतीने माझी गाळण उडालेली... मी तापाने फणफणलो. पुढचे पंधरा दिवस अंथरूण धरलेलं. तुम्ही म्हणाल या किश्शाचा आणि वाचनाचा काय संबंध? नक्कीच आहे. सांगतो.

मी त्यानंतर पंधरा दिवस अंथरूण धरलं. मग बाबांनी लायब्ररीतून 'श्रीमान योगी' हे पुस्तक वाचायला आणून दिलं. इतका रमून गेलो त्या पुस्तकात की नंतर एसटी प्रवास करताना डोंगर दऱ्या दिसल्या की रानात टप टप घोड्यांचे आवाज घुमायचे आणि शिवाजी महाराज आणि त्यांचं सैन्य सामोरं जाईल वाटायचं. एकदा एका किल्ल्यात फिरताना घोड्याची नाल सापडली. ती मी कितीतरी दिवसं देवातच ठेवली होती. त्यातले कित्येक प्रसंग तर कितीतरी वर्षं डोळ्यांसमोर तरळत राहिले... लग्नाची पत्रिका द्यायला आलेला तानाजी... 'आधी लगीन कोंढाण्याचे मग माझ्या रायबाचे' कसलं भारी ना हे. जगण्याच्या गलबल्यात ही चित्रं धूसर होतं गेली पण पूर्णपणे पुसल्या मात्र कधीच गेली नाहीत. पूर्वी नेलकटर नव्हते. ब्लेडनी नखं कापावी लागतं. बोटाला थोडं जरी लागलं तर दिवसभर कुरवाळत बसणारे आपण आणि अंगावर शेकडो जखमा घेऊनही, महाराज गडावर पोहोचले नाहीत, तोफांचे आवाज आले नाहीत, बाजी पडणार कसा? असं काहीतरी सारखं मनात घुमत राहायचं.

इतिहास म्हणजे शिवाजी महाराज आणि शिवाजी महाराज म्हणजेच आपला इतिहास हे लहानपणी श्रीमान योगी वाचल्यापासून पक्के पक्के झालेले. म्हणून म्हणतो, लहानपणी भुताच्या शोधात निघालेला मी तेव्हापासून पुस्तकात मुशाफिरी करायला लागलो अन् आजतागायत तो 'याराना' कायम आहे. नंतर कधीतरी 'गोर्की'ची 'आई' वाचण्यात आली. भारावून जायला झालं. जेवणाच्या डब्यातून मजुरांमध्ये क्रांतीची पत्रकं वाटणारी त्याची आई. धाड-धाड बूट वाजवीत घरी येणाऱ्या पोलिसांची संख्या आणि गॉर्कीभोवती कोंडाळं करणाऱ्या मजूर यांच्यापैकी कोणाची संख्या जास्त आहे हा विचार करून हे मजूर आपल्या मुलाला वाचवू शकतील का? असा जेव्हा विचार करायला लागते तेव्हा ती क्रांतिकारी वाटणारी आई डिट्टो आपल्या आईसारखीच वाटायला लागायची. अशी किती पुस्तकं सांगावीत जगणं समृद्ध करणारी. अशी पुस्तकं वाचत गेलो, मनं भरत गेलं. अगदी तसंच जगता नाही आलं तरी त्या जगण्याची ऐपत कळली ती केवळ आणि केवळ पुस्तकांमुळेचं....

**संपर्क ९८६०५६४१५४**


# प्रार्थना

ज्ञानही विज्ञानही शाळा ही आपुली
ज्ञानसिंधू भासते आम्हांस माय माउली ।। धृ. ।।

वरदायिनी तुझा आशिष राहू दे सदा शिरी
धैर्यवंत होऊ दे, सामर्थ्य लाभू दे करी
संस्कार नि संस्कृती तुझ्या रूपेच पाहिली
ज्ञानही विज्ञानही शाळा ही आपुली
ज्ञानसिंधू भासते आम्हांस माय माउली ।। १ ।।

विद्यारत्न भूषणे तुझ्या कुशीत घडविसी
कलेतही, क्रीडेतही तू अग्रगण्य शोभसी
ध्येयसिद्ध होऊ दे, बल लाभू दे पाउली
ज्ञानही विज्ञानही शाळा ही आपुली
ज्ञानसिंधू भासते आम्हांस माय माउली ।। २ ।।

अस्मिता तुझियामुळेच लाभली आम्हां असे
स्वातंत्र्य, न्याय, बंधुता अंतरी सदा वसे
सत्य तू, शील तू, बुद्धी देई चांगली
ज्ञानही विज्ञानही शाळा ही आपुली
ज्ञानसिंधू भासते आम्हांस माय माउली ।। ३ ।।




संयुक्ता कुलकर्णी
संपर्क ७४४७४२५४५५

डॉ. संजीव कुलकर्णी

# देवी

“आई, दुखेल का गं फार?''

‘‘दुखेल, पण फार नाही दुखणार.''

‘‘मग दुखणार असेल तर कशाला घ्यायचं इंजेक्शन?''

‘‘इंजेक्शन नाही बाळा, ती लस आहे.''

''मग ती लस तरी कशाला घ्यायची?'' रोहितचे प्रश्न संपतच नव्हते.

‘‘अहो, तुम्ही जरा सांगता का याला.'' रोहितची आई शांतपणे त्याच्या बाबांना म्हणाली. मुलांच्या शंकांना कंटाळायचं नाही. त्यांनी कितीही प्रश्न विचारले तरी शांतपणे त्याची उत्तरं द्यायची. तीही खरी. रोहितच्या आई-बाबांनी रोहितच्या लहानपणापासून हे पाळलं होतं. जितक्या शंका, जितके प्रश्न मुलं विचारतील तितकी त्यांच्या ज्ञानात भर पडत जाते असं त्या दोघांचं मत होतं. ते खरंच होतं. रोहित त्याच्या वर्गातला सगळ्यात स्मार्ट मुलगा होता.

‘‘हे बघ रोहित, ही जी लस असते ना, त्यामुळे आपली प्रतिकार शक्ती वाढते. म्हणजे ज्या जंतूमुळे आपल्याला हे वेगवेगळे रोग होतात ना, त्यांच्याशी लढण्याची आपली शक्ती.''



''ती कशी वाढते हो, बाबा?''

''सांगू? पण त्याआधी तुला एक गोष्ट सांगतो.'' गोष्ट म्हटल्यावर रोहित खुलला. ''गोष्ट आहे अठराव्या शतकातली, इंग्लंडमध्ये एक मुलगा होता. तुझ्यासारखाच, सारखे प्रश्न विचारणारा. त्याचं नाव होतं एडवर्ड जेन्नर. त्यालाही सारखे प्रश्न पडायचे. त्या काळात इंग्लंडमध्ये देवीची साथ आली होती.''

''देवीची साथ म्हणजे?''

''देवी नावाचा एक रोग होता. भयंकर रोग. यात लोकांच्या अंगभर फोड यायचे. कित्येक लोक आंधळे व्हायचे. जगात लाखो लोक या रोगाने मरण पावले. त्यावर काही उपायही नव्हता बरं का. मोठा झाल्यावर जेन्नरला प्रश्न पडायचा की याच्यावर उपचार का नाही? मग एकदा त्याच्या लक्षात आलं की सगळ्या लोकांना देवीचा आजार होतो पण दूध घालणाऱ्या गवळ्यांना काही कधी तो होत नाही.''

''गवळ्यांना म्हणजे?''

''अरे, पूर्वी दुधाच्या पिशव्या मिळत नसत. ज्यांच्याकडे गाई असत ते लोक गाईच्या दुधाची धार काढत आणि घरोघरी जाऊन दूध पुरवत. तर जेन्नरला असा प्रश्न पडला की, या लोकांना देवीचा रोग का होत नाही? मग तो सरळ गेला या गवळ्यांच्या घरी आणि त्यानं त्या गाईंचा गोठा बघितला.''

रोहित सुट्टीत त्याच्या आजोळी जात असे त्यामुळे त्याला गोठा म्हणजे काय हे माहीत होतं.

'मग?'

''आणि तो बघतो तर काय, त्या गोठ्यातल्या गाईंनाही असलाच देवीसारखा आजार झाला होता. इतका गंभीर नाही, पण तसाच. या गाईंच्या गोठ्यांत काम करणाऱ्या लोकांनाही तसलाच आजार झाला होता, पण तो देवीचा आजार नव्हता. पण त्यांच्याही अंगावर तसेच फोड आले होते. मग जेन्नरला वाटलं की या रोगाच्या सहवासात आलेल्यांना देवीची लागण होत नसावी. मग त्यानं काय केलं, की गाईंना झालेला जो आजार त्यांच्या गोठ्यांत काम करणाऱ्या लोकांना झाला होता ना, त्या तसल्या फोडांतला थोडासा द्रव काढला आणि तो एका लहान मुलाच्या अंगात टोचला.''

''आई गं!''

''हो ना. आणि त्या काळात काही आजच्यासारख्या इंजेक्शनच्या सिरिंजेस वगैरे नव्हत्या. पण तरीही त्या लहान मुलाच्या बापानं आपल्या मुलावर हा प्रयोग करायला जेन्नरला परवानगी दिली म्हणजे बघ ना.''

''मग त्या लहान मुलाला काही झालं का?''

''थोडीशी कणकण आली. थोडा अशक्तपणा आला, तोंडाची चव गेली, पण दोन दिवसांत तो मुलगा खडखडीत बरा झाला. आता खरी परीक्षा पुढंच होती. जेन्नरने काही दिवसांनी त्या मुलाच्या शरीरात देवीच्या फोडांतला द्रव टोचला. किती मोठा धोका होता त्यात! पण कमाल आहे. त्या मुलाची, आपल्या मुलावर असा प्रयोग करायला परवानगी देणाऱ्या त्या मुलाच्या बापाची आणि अर्थातच एडवर्ड जेन्नरची.''

''मग त्या मुलाला काही झालं का?''

''रोहित, त्या मुलाला थोडा ताप आला, त्याचा अंगावर थोडे पुरळ आले, पण त्याला देवीचा रोग काही झाला नाही.''

'वॉव'

''येस, इन्डीड वॉव. इथून जेन्नरच्या लक्षात आलं की अशा प्रकारे लोकांच्या शरीरात



**एडवर्ड जेन्नर.**

रोगप्रतिकारक शक्ती निर्माण करता येऊ शकते. पुढे जेन्नरने हा प्रयोग बऱ्याच लोकांवर केला. त्यामध्ये त्याचा अकरा महिन्यांचा मुलगा रॉबर्टपण होता. हे सगळे लोक देवीच्या रोगापासून वाचले, अगदी खडखडीत बरे झाले.''

''कसलं भारी आहे ना हे बाबा?''

''आहे की नाही? पुढं मग याच्यावर बरंच संशोधन झालं, बराच अभ्यास झाला आणि लसींचा जन्म झाला. लस म्हणजे काय असतं माहीत आहे का? बहुतेक वेळा ज्या जीवाणूंमुळे आपल्याला आजार होतो तेच जीवाणू लसीमध्ये असतात, पण त्यांना जरा लुळंपांगळं केलेलं असतं. त्यामुळे आपल्याला आजारबिजार काही होत नाहीत, पण आपल्या शरीरात त्यांच्या विरुद्ध लढण्याची शक्ती तयार होते. आता तर माणसाला आणि प्राण्यांना होणाऱ्या बहुतेक सगळ्या आजारांविरुद्‌ध अशा लस तयार करण्यात आपण यशस्वी झालो आहोत.''

''म्हणजे लस घेतली की ते आजार आपल्याला होत नाहीत, होय ना?''

''अं.. होत नाहीत असं नाही पण होण्याची शक्यता फार कमी होते. मग, घेणार ना तू लस? थोडं दुखलं तरी?''

''हो बाबा, पण आता एकच प्रश्न. या रोगाला देवी का म्हणतात?''

''अरे, पूर्वी असा समज होता की कुठल्यातरी देवीचा कोप झाला की हा रोग होतो. पण आता आपल्याला माहीत आहे की, हा रोग जीवाणूंमुळे किंवा विषाणूंमुळे होतो आणि वेळेवर लस घेतली की तो होण्याची शक्यताही फार कमी होते. कुणी सांगितलं सांग बरं हे आपल्याला पहिल्यांदा?''

''जेन्नर. एडवर्ड जेन्नर.''

**संपर्क ९८२३१७९५९७**

'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस सर्व्हे नं. ४८, घर पट्‌टी नं. ४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे ४०० ६१२, येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४ येथे प्रसिद्‌ध केले. ✻ संपादक– कृष्णकुमार पाटील.

'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane- 400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune- 411 004 * Editor : Krishnakumar Patil.




# आता मैदानावर चला..

मोबाइल गेम्स पुरे मित्रहो! आता मैदानावर चला;
नजर होईल अधू, तिला खरा उजेड दावा..

बटणे खेळून मान वाकली, जरा 'हु-तू-तू'ही म्हणा;
मेंदू होईल बधिर म्हणून 'खो-खो'मध्ये पळा..

पाठ भरून आली का? 'आबाधुबी'चा चेंडू फेका;
पायात गोळे आल्यावर हळूच 'लंगडी' घाला..

राग कोणावर आला तर 'लगोरी'ची कौलं रचा;
एकलकोंडे वाटले की 'भातुकली'त बाहुलीसंगे नाचा ..

घुसमट झाली जिवाची तर 'पाठशिवणी' करा;
कंटाळा भारीच बोचला की 'पोहायला'ही शिका..

बसून गुडघे वेदना देतील, धावायची धूम ठोका;
उत्साह वर्धन होण्यासाठी, उड्या वेगळ्या घ्या..

नुसते भुंगे घालून मस्तकी, घरात सुस्तावू नका;
गंमत आणण्या आपसांत, 'आंधळी कोशिंबीर' खेळा..

नका झोंबू इतके मोबाइलला, डोके पिसाळून जाईल;
आजारांना नको निमंत्रण, जिणे गोंधळून जाईल..

बाहू पसारा, मुक्त खेळा, हसा-हसवा, व्हा सारे नवे
खेळात खेळून रंजन करू, द्वेष-दुश्मन कशाला हवे?

सतीश लोथे
७८८७८६७५७४

# कुतूहल

अमित डहाणे, ९४२१०५०३८८

'किशोर' मित्रांनो, 'किशोर' डिसेंबर २०२२ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ जानेवारी २०२३ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

## Q&A

**१) जी-२० या आर्थिक संपन्न देशांची १७वी परिषद कोणत्या देशात पार पडली?**
१) जपान २) भारत ३) इंडोनेशिया ४) अमेरिका

**२) जागतिक मधुमेह दिन २०२२ या वर्षासाठीची थीम काय होती?**
1) Access to Diabetes education
2) Diabetes Free world
3) Say No to Diabetes
4) My Health My Responsibility

**३) ९६व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपदासाठी कोणाची निवड करण्यात आली?**
१) भारत सासणे २) न्या. नरेंद्र चपळगावकर
३) लक्ष्मीकांत देशमुख ४) विश्वास पाटील

**४) पृथ्वीच्या वातावरणात आढळणारा नायट्रोजन वायू कोणत्या स्रोतामार्फत निर्माण झाला आहे?**
१) ज्वालामुखीमार्फत २) सूर्यामार्फत
३) चंद्रामार्फत ४) पर्जन्यामार्फत

**५) खेलरत्नसाठी शिफारस करण्यात आलेल्या अचंता शरथ कमल ह्या कोणत्या क्रीडाप्रकाराशी संबंधित आहेत.**
१) हॉकी २) भाला फेक ३) टेबल टेनिस ४) फुटबॉल

**६) महाराष्ट्रातील 'काळा कातळ' असे कोणत्या भौगोलिक घटकाला म्हणतात?**
१) महाराष्ट्रातील कमी पावसाचा प्रदेश
२) महाराष्ट्रातील कमी उष्ण प्रदेश
३) महाराष्ट्रातील बेसॉल्ट खडक
४) महाराष्ट्रातील काळी मृदा

**७) नुकतेच नव्याने निवडले गेलेले ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक कोणत्या राजकीय पक्षाचे आहेत?**
१) लेबर पार्टी २) कंजर्व्हेटिव्ह पार्टी
३) डेमोक्रॅटिक पार्टी ४) कम्युनिस्ट पार्टी

**८) शरीरात निर्माण होणाऱ्या ऊर्जा प्रक्रियेसाठी सर्वांत महत्त्वाचा घटक कोणता आहे?**
१) ग्लुकोज २) इन्सुलिन
३) युरिया ४) मेद (Fats)

**९) अग्निबाणाचे कार्य न्यूटनच्या कितव्या नियमावर आधारित आहे?**
१) पहिला २) दुसरा ३) तिसरा ४) चौथा

**१०) 'धुवांधार' धबधबा कोणत्या नदीवर आहे?**
१) तापी २) गोदावरी ३) नर्मदा ४) कृष्णा

**११) देशातील सर्वोत्तम संस्था म्हणून नुकतेच कोणत्या शैक्षणिक संस्थेला गौरविण्यात आले?**
1) JNU 2) IIT Mumbai
3) IIM Delhi 4) DU

**१२) २०२२ या वर्षीचा आयसीसी टी ट्वेन्टी (T-20) विश्वकप जिंकणाऱ्या इंग्लंड पुरुष क्रिकेट संघाने हा किताब कितव्यांदा मिळवलेला आहे?**
१) पहिल्यांदा २) दुसऱ्यांदा
३) तिसऱ्यांदा ४) चौथ्यांदा

**१३) विषाणू हे जीवाणूसारखे स्वावलंबी...**
१) नसतात २) असतात
३) हे निश्चित सांगता येत नाही.
४) हे शरीररचनेवर अवलंबून आहे.

**१४) खालील कोणत्या देशात सिंह, वाघ आणि चित्ता या तिन्ही प्राण्यांचे एकाच वेळी अस्तित्व होते?**

१) चीन २) दक्षिण आफ्रिका

३) भारत ४) ऑस्ट्रेलिया

**१५) भारतात एकूण उच्च न्यायालयांची सद्य:स्थितीत संख्या किती आहे?**

१) २१ २) ३०


३) ३५ ४) २५

---

## चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

### चित्रकोडे डिसेंबर २०२२ची उत्तरे




### चित्रकोडे ऑक्टोबर–नोव्हेंबर (दिवाळी) २०२२ यशस्वी स्पर्धक

- **अकोला–** कु. खुशी उभे
- **अमरावती–** कु. सपना बाकोडे, कु. काजल बाकोडे, कु. सरिता बाकोडे, कु. अश्विनी वानखडे, कु. सुवर्णा वानखडे, कु. आराध्या वानखडे, कु. श्रेयस वानखडे, कु. सुहास वानखडे, कु. चिऊताई वानखडे
- **चिपळूण–** कु. सुमुख केतकर
- **सिंधुदुर्ग–** कु. वेदांत कदम, कु. पूर्वा जाधव, कु. अथर्व आजगावकर, कु. ओम देऊलकर, कु. इशान नाईक
- **पालघर–** कु. खुशी राऊत, कु. प्रांशी राऊत
- **सातारा–** कु. सुवीर फडे
- **नवी मुंबई –** कु. विवान

### कुतूहल डिसेंबर २०२२ ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ३ | २) २ | ३) २ | ४) ४ | ५) २ |
| ६) ३ | ७) १ | ८) १ | ९) १ | १०) ३ |
| ११) २ | १२) ३ | १३) १ | १४) ४ | १५) १ |



# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/– चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



मी नेहमीप्रमाणे शाळेतून घरी आलो, कपडे बदलले आणि रानामध्ये बकरे घेऊन गेलो. मी जाता-जाता दुकानामध्ये गेलो, तेव्हा मी तेथे एक लहानसा कुत्रा पाहिला. तो कुत्रा जखमी होता. आणि तो भुकेने व्याकूळ होता. मग मी दुकानाहून बिस्किट पुडा घेतला आणि त्या कुत्र्याला बिस्किटे खाऊ घातली मग तो कुत्रा शांत झाला. मी कुत्र्याच्या जखमेवर मलम लावला. तेव्हा मला खूप-खूप आनंद झाला. मी रानातून घरी आलो तेव्हा मी माझ्या आई-बाबांना हा प्रसंग सांगितला तेव्हा मला त्यांनी शाबासकी दिली आणि माझे कौतुकही केले. सकाळी मी शाळेत आलो. मी माझ्या सरांना हा प्रसंग सांगितला तेव्हा मला त्यांनीही शाबासकी दिली. परिपाठात माझे कौतुक केले.

**कु. ओम सचिन पांचाळ**
इ. सहावी, जि.प.पू.प्रा.केंद्रशाळा,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी ४१६७०४



एकदा काय झाले. मी बाबांबरोबर बाहेर चाललो होतो. अचानक एक काका आमच्या समोर चक्कर येऊन पडले. त्यांना 'काय झाले?' विचारताच त्यांनी बरे वाटत नसल्याचे सांगितले. मी माझ्या जवळील पाण्याची बाटली त्यांना दिली. त्यांनी पाणी प्यायल्यावर मी जवळच्या बंगल्यामध्ये राहत असल्याचे सांगितले. मी व बाबांनी त्यांना त्यांच्या घरात सोडले. काकूंना सर्व परिस्थितीची कल्पना देताच त्यांनी त्यांच्या फॅमिली डॉक्टर काकांना फोन केला. काकूंनी आमचे आभार मानले. आम्ही कृतकृत्य झालो. सकाळच्या वेळी काकांना मदत करण्याने मला खूप समाधान वाटले. मी नेहमीच दुसऱ्यांना मदत करत राहीन असा निश्चय केला. मी काका लवकर बरे व्हावेत यासाठी देवाकडे प्रार्थना केली. आता काका ठीक आहेत व सकाळी आम्ही फिरायला गेलो की आम्हांला नेहमी दिसतात व हसतमुखाने आम्ही 'शुभ प्रभात' म्हणतो.

**कु. कौस्तुभ सारंग कुलकर्णी**
इ.तिसरी, आर्यन्स वर्ल्ड स्कूल, पुणे



माझे नाव वैभवी. मी इ. सहावीमध्ये आहे. आमच्या शाळेपासून माझे घर लांब आहे. शाळेत येताना रस्त्यावर एक छोटासा पक्षी पडलेला दिसला. त्याच्यावरून एखादे वाहन जाण्याची शक्यता होती. मी त्याला उचलले व रुमालातून अलगद शाळेत आणले. माझी मैत्रीण श्रुती हिच्या मदतीने त्याला पाणी पाजले. जखमेवर हळद लावली. थोड्याच वेळात तो छोटासा पक्षी तरतरीत झाला. उडण्याचा प्रयत्न करू लागला आणि उडून खिडकीवर बसलासुद्धा. मला खूप आनंद झाला. ही सगळी गोष्ट मुलांनी मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांना सांगितली. सगळ्यांनी मला शाबासकी दिली. एका पक्ष्याचा जीव वाचवल्याने मला खूप आनंद झाला.

**कु. वैभवी विजय महाडीक**

इ. सहावी, जि.प.पू. प्रा.केंद्रशाळा, ता. दापोली, जि. रत्नागिरी ४१५७१२



मी गणपतीच्या सुट्टीसाठी गावी चिखली (वास्को-द-गामा, गोवा) येथे गेलो होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी नाष्टा करायला आम्ही अन्नपूर्णा नावाच्या उपाहारगृहात गेलो होतो. बाहेर येताना तेथे एक गरीब भुकेला माणूस मदत मागताना दिसला. मला खूप वाईट वाटले. आई-बाबांना मी म्हणालो की, आता गणपती आहेत आणि सगळेकडे खूप खूप रोषणाई आहे. पण ह्या दादांना जेवण नाही. मग आई-बाबांनी एक लाडूचा खाऊ माझ्या हातात दिला. मी लगेचच तो त्या दादांना दिला. दुपारी केळीच्या पानावर जेवताना मी एकूण-एक भाताचा शीत संपवला. जगात खूप लोक उपाशी राहतात. अन्न वाया घालवू नये. मोठा झालो की मी खूप पैसे कमवणार आणि सर्व गरिबांना जेवण देणार.

**कु. विवान**

इ. चौथी, डीडब्ल्यूपीएन शाळा नेरूळ, नवी मुंबई



आमच्या गावचा आठवडी बाजार शनिवारी असतो. मी शाळेतून लवकर आले होते. येताना एक आजी भाजीचे दोन गाठोडे घेऊन बसमधून उतरत होती. आजीला गाठोडे उचलत नव्हते, आजीला भाजी विकण्यासाठी जाण्यास उशीर होत होता. आजी कोणी मदत करेल का? म्हणून इकडे तिकडे पाहत होती परंतु कोणीही मदत करत नव्हते. मी पळत जाऊन आईला बोलावले. आईने आजीचे गाठोडे बाजारापर्यंत नेऊन दिले. आजीला खूप आनंद झाला. मलाही खूप छान वाटले. आजीने प्रेमाने माझ्या डोक्यावरून हात फिरवला व माझ्या बाईंनी पण माझे खूप कौतुक केले.

**कु. आराध्या शिलवंत पुजारी**

जि.प.शाळा होटगी मराठी, मु.पो.होटगी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर ४१३२१५

# उमलती प्रतिभा

## शाळा

शाळा म्हणजे ज्ञानाचे मंदिर
शाळेत आहे विद्येचे कंदील

विज्ञानाच्या मंदिराची दुनिया न्यारी
शाळेतील मित्र-मैत्रिणीमध्ये अतूट यारी

शिक्षण शाळेत दिवा लावतात संस्काराचा
प्रत्येक मुलाला लळा लावतात प्रेमाचा

दूर करू शिक्षणाबद्दलचा आळस
विद्येच्या मंदिरात ज्ञानाचा उभारू कळस

शाळेत खोड्या केल्याशिवाय चैन मिळत नाही
शिक्षकांनी शिक्षा दिल्याशिवाय अक्कल येत नाही

शिकवण घेऊ थोर महात्म्यांची
माहिती मिळवू पृथ्वीवरील साधनसंपत्तीची

शाळेतील शिक्षकांचा मार लागतो कडू
साक्षरता प्राप्त करण्यासाठी आपण सर्वांशी भिडू

कु. सिद्धी दामोदर नारकर
माध्यमिक विद्यामंदिर सौंदळ, इ. दहावी,
मु.पो. सौंदळ ता .राजापूर, जि. रत्नागिरी

## एक होता बेडूक



एक होता बेडूक
मारत होता उड्या,
म्हणतो कसा तोऱ्याने
घाला मला पायघड्या.

एक होता ससा
म्हणतो जरा बसा,
गाजर किसून तुमच्यासाठी
हलवा बनवतो खासा.

एक होती खारुताई
म्हणते पळा पळा,
ऐकले नाही माझे तर
रडेल मी घळाघळा.

एक होता उंदीर
म्हणतो जरा धरा धीर,
मांजर पाहून आगाऊपणे
म्हणतो तिला थिर थिर !

एक होते माकड
पाहिजे त्याला पापड,
दिला नाही तर म्हणे
देईन एक झापड.



कु.गीतांजली शरद व्यवहारे.
इयत्ता - चौथी, एस.के. सोमैय्या
प्राथमिक विद्यामंदिर, श्रीरामपूर, जि.अदमदनगर

## निसर्गाचं झाड (बकुळीचं गाणं)

आजोळच्या अंगणात बकुळीचं झाड
बकुळीचं झाड, त्याचं खोड किती जाड
खोड किती जाड पण फुलं किती छोटी
फुलं किती छोटी, माळ किती मोठी
माळ किती मोठी तिपदरी गजरा
तिपदरी गजरा न् सगळ्यांच्याच नजरा
तिपदरी गजरा माळू नको ताई
बरी आहे फुलांनी झाकलेली भुई
फुलांच्या सड्यावर बांधू कसा झुला
झुला बाई झुला पाय लागेल की फुलां
फुलांना ओंजळीत अलगद धरा
गोड गोड वास तो मनामध्ये भरा
मनामध्ये भरावा ओंक्षभर यावा
त्याच्यासंगे जावं आजोळच्या गावा

वैष्णवी गणेश शिर्के
इ. सातवी, जि.प.शाळा, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे

# घमेंडी मुलगी आणि कष्टाळू मुलगी

एक मुलगी होती, तिचे नाव होते साजिरी. ती खूप कष्टाळू आणि समजूतदार होती. साजिरी खूप गरीब होती. तिच्या शेजारची मैत्रीण होती तिचे नाव होते लीला. लीला खूप घमेंडी होती. ती रोज गरीब मैत्रिणीला आपल्या रस्त्याने जात असताना टोमणे मारायची. लीला साजिरीला खूप टोमणे मारायची. एके दिवशी लीलाचा ड्रायव्हर तिची गाडी धुवत होता. तेव्हा तिथे एक मुलगी आली, तिचे नाव होते रिंकी. ती म्हणाली, "लीला, मी येते तुझ्या बरोबर." लीला मनातच म्हणाली, "हिची लायकी तरी आहे का माझ्या गाडीत बसायची?" तरीपण लीलाने सांगितलं की, बस. लीला आणि रिंकी गाडीत बसल्या आणि शाळेत गेल्या. शाळेतून येताना लीला ड्रायव्हरला म्हणाली, "ड्रायव्हर दादा गाडी परत धुवा." ड्रायव्हरने घरी आल्यावर गाडी धुतली. लीला घरात गेली आणि आईला म्हणाली, "अगं आई, आपल्या शेजारची रिंकी माझ्याशी स्वत:ची तुलना करते. मी आता ड्रायव्हरला सांगितलं गाडी धूवून घे." आईही म्हणाली, "अशांना आपली जागा दाखवलीच पाहिजे." एके दिवशी साजिरी रिक्षाने जात असताना लीलापण येत होती. त्या दोघी एकाच रस्त्यावर होत्या. लीला म्हणाली, "हिची लायकी तरी आहे का माझ्या बरोबर रस्त्यावरून चालायची?" ती ड्रायव्हरला म्हणाली की गाडी फास्ट घे. ड्रायव्हरने गाडी फास्ट घेतली तर लीला म्हणाली, "आणखी फास्ट घे." फास्ट घेता-घेता गाडी एका झाडावर आदळली. लीला बेशुद्ध झाली. साजिरी तिथे आली आणि लीलाला घेतलं व आपल्या रिक्षात बसवले आणि हॉस्पिटलला घेऊन गेली. मग साजिरीने तिच्या आईबाबांना फोन केला. काही वेळाने तिचे आईबाबा आले. तेवढ्यात लीलाला जाग आली आणि आई म्हणाली, "या साजिरीनेच केला असणार तुझा ॲक्सिडेंट! या साजिरीनेच केला असणार." आई साजिरीला खूप बोलली तेवढ्यात लीला म्हणाली, "अगं आई, हिनेच माझा जीव वाचवला आहे." लीला म्हणाली, "साजिरी मला माफ कर, मी तुला काहीही म्हणाले." मग थोड्या दिवसांनी लीला घरी आली. साजिरी आणि लीला मैत्रिणी बनल्या. तेव्हापासून लीलाने साजिरीला टोमणे मारायचे बंद केले. बेशुद्ध पडलेला ड्रायव्हरपण नंतर बरा झाला. लीला आता सर्वांशीच प्रेमाने वागू लागली.

**कु. दिक्षा संदीप गावडे, इ. चौथी,**
जि.प.प्रा. शाळा सरमळे देऊळ,
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग.



**कु. अंजुम मिरासाहब काझी,** इ सातवी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संजवाड, पो. औराद, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर



**कु.निदा हुमेरा मूनवर शेख,** इ. दुसरी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रायपूर, ता. सेलू, जि.परभणी



**कु. प्रमोदिनी आनंद पिंपळे,** इ. दुसरी, नवीन मराठी शाळा पंचशील नगर, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर

# पाठलाग

घनश्याम देशमुख
संपर्क ९८२३४१३६२९





तिच्यावर कुणी हल्ला केला नाही आणि केला तर ती तिच्या शिंगाने त्याला घायाळ करेल
तिचं ठीक आहे रे! पण आपल्यावर कुणी हल्ला केला तर आपण कुणाला शिंगावर घेऊ?
गण्या, तुला शिंगं असायला हवी होती, म्हणजे तू कुणालांच घाबरला नसतास
थांब ! मी इथून कपिलेला हाक देतो, इथेच कुठंतरी असेल ती
कपिला SS
ते बघ तिकडे आवाज येतोय
घंटेचा आवाज येत नाही... म्हणजे ती कपिला नसावी कोण असेल?
क्रमशः

# जहाज

निळ्या निळ्या नभी
शुभ्र धुतले जहाज
हळुवार झुळुकेचा
गोड हाकतो आवाज

थवा पाखरांचा उडे
भुयारात रेल्वेगाडी
जणू बालक खट्याळ
पाटीवर रेघ ओढी

नाही बटण वा चावी
मंद जहाज चालते
रश्मीकिरण एकटी
रंगरंगोटी करते

घडीघडीला आकार
जहाज हे बदलते
'पडलो मी' किंचाळता
आई कुशीमध्ये घेते

**तुकाराम खिल्लारे,**
**संपर्क : ८८३०५९९६७५**



## इंग्रजी विभाग

# My food journey

Dr Rasika Thosar
9970273841

When I take a big bite of food
My tummy growls in a happy mood

Teeth will chew it chop chop chop
The tongue will taste it on the top

All the food mixing happens in the mouth
It enters the food pipe which is so stout

Esophagus, stomach and small intestine
Round and round, it slides just fine

Water and juices mix on the way
The body gets the vitamins every day

Fibres and wastes run in large intestines
Those get thrown out at morning times

That's how food travels in my tummy
Let's eat what's special and yummy!



# Smiling Mountain

Prof. B. N. Chaudhari

Sham lived in the small village of Khandesh. Dharni was the name of his village. The village was very small but clean, peaceful, and beautiful. It was located at the base of a mountain. His father was a woodcutter. He sold firewood bundles in the village. His mother helped his father. Woodcutting and selling brought food for the family. Sham was a student. He was a regular and clever student of the Jivan Shikshan Vidyalaya of the village. Before going to school, Sham would wake up early. He would walk with his father in the jungle. He helped his father as much as he could. Sham was very fond of trees, flowers, leaves, butterflies, and birds. Nature was like a second school for him. When his father would cut trees for wood, he felt very sad. He remembered his teacher's teaching. Trees are also living creatures like men and



animals. They breathe, and eat food too. They feel pain too. He thought in his mind, that woodcutting is not good for nature. But, he was helpless.

One day he asked his father a question, with fear in his mind, “Baba, when you cut a tree with an axe, will it not hurt the tree? What will happen if all other people cut trees like us? Will a single tree remain on the mountain? One day, the mountain will become bald. Then what will we do?" Baba and Aaiee smiled at his questions. Sham told them what he learned in school. They feel proud of Sham. Trees give oxygen and provide shade. They also provide food to animals. Rain comes due to trees. If trees are not there, how can we live? They both start thinking of Sham's suggestions. That night Sham's mother saw a dream. It was very dangerous. All trees from the mountain had vanished. The mountain looked very pitiful. Like, Stags without horns, and Peacocks without feathers. Like a lady without hair. The mountain became barren. There was not a single bird or animal. She exclaimed... How will we get wood now?

In the morning, Aaiee told about her dream to Baba and Sham. Both froze. They started to think. They forgot to go to the jungle. They thought over Shams's questions and the dream. They made a firm decision in their mind. The next day they all woke up. Aaiee and Baba started to walk in the jungle. Sham was at the door. His father told him to stay at home. They left their home without their axes. Sham was worried. He snatched his bag. Did his homework. Went to school on time. When the bell rang, he ran back home. What he saw in his home made him exclaim with surprise! There were Palash tree green leaves everywhere. Baba was sitting there. They are making plates from leaves. Mother was making papads. Papads and leaf plates were spread everywhere in the home. There were no wooden bundles in the yard.

Sham sat with his father. He asked, "Baba, no wood today? Now what will we sell in the market? How will we get money ? What about our food?". His chain of questions was endless. Baba gathered the leaves, and with a smile on his face said “Sham, how many questions will you ask? Keep quiet, collect these leaf plates” He looked at Sham's mother. She was also smiling. They both took Sham in their arms. They started speaking, “Sham, we thought over your questions. And, we decided. We will gather only dry wood. We will not cut green trees. No axe... No cutting wood! Let's ban the axe in this household! Sham, this is very nice. You opened our eyes. Now, no more greediness. Let's not cut wood for money." Baba spoke everything that was going on in his mind. Now Aaiee started speaking. “Yes, there is a problem with money, but, we will manage it. We can prepare plates from leaves. We can collect honey, and gum from the jungle. We will sell it in the market. I will prepare papads, pickles, and chutneys from the fruits we got in the jungle. These all have good demand in the market .”

Baba stood up, and with a glance at the mountain said, “The mountain is our pride. We will not trouble it. We will not spoil our nature. We strictly follow it and ask people to follow us. Your teacher is absolutely right. Now we all save our mountain.” Sham became very happy.


**Contact :9422262495**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

Re-arrange the pictures serially.

1



Write a number in each square so that each multiplication problem is solved.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | x | □ | = | 15 |
| x | | x | | x |
| □ | x | □ | = | □ |
| = | | = | | = |
| 20 | x | □ | = | 120 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | x | ○ | = | 9 |
| x | | x | | x |
| ○ | x | ○ | = | ○ |
| = | | = | | = |
| 12 | x | ○ | = | 72 |

# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.


२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ जानेवारी २०२३.

३) कोड्याचे उत्तर फेब्रुवारी २०२३ च्या अंकात प्रसिद्ध होईल.


४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.12.2022 Posting on 27th & 28th December 2022
License to Post without prepayment of postage No. WPP-53






कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा

लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकाच्या चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित 'निवडक किशोर'चे १४ खंड



किंमत प्रत्येकी ₹ १६३/- (30% सूट)



किशोर

वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ १६००/-


**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,